दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -५० रविवार दि.२७ ऑक्टोबर २०२४ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-50 Sunday, Dt.27 October 2024 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## आण्णांना विजयी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे - शिवराज पवार



प्रतिनिधी । गेवराई

मतदारसंघातील संघातील जनतेने आमदार लक्ष्मण आण्णांनच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत दहा वर्ष सेवा करण्याची संधी दिली. त्या संधीचे आण्णांनी सोन करून मतदारसंघात गाव तिथे रस्ता करत

(उर्वरीत पान २ वर)

# उमेदवारीवरुन सुरु झालेली फडफड पवारांनी माहोल बदलूनच केली शांत !

### आमदार संदीप क्षीरसागरच पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार !!

बीड /राजयोग प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीचे वेध लागल्यापासून बीडच्या उमेदवारीच्या अनुषंगाने उलट-सुलट चर्चा रंगवल्या जात होत्या. तसेच बीड जिल्ह्यातील एकमेव निष्ठावंत आमदार संदीप क्षीरसागर यांच्या उमेदवारीच्या अनुषंगाने विविध अफवा पसरवल्या जात होत्या. यावर आता पूर्ण विराम लागला असून राष्ट्रवादी-काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून आ.संदीप क्षीरसागर यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी-काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर बीड जिल्ह्यातून एकमेव आमदार असलेले संदीप क्षीरसागर शरद पवार यांच्यासोबत एकनिष्ठ राहिले. आ.क्षीरसागरांनख त्यांच्या भूमिकेपासून परावृत्त करण्यासाठी अनेक प्रलोभने देण्यात आले. अनेकप्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केला. परंतु कसल्याही दबाव आणि प्रलोभनांना न जुमानता आ.संदीप क्षीरसागर शेवटपर्यंत आपला पक्ष, नेते आणि विचारांसोबत राहीले. राष्ट्रवादी पक्षात फूट पडल्यानंतर आ.क्षीरसागर यांनी बीड जिल्ह्यातील पक्षीय कामकाजाचे सूत्रे देखील सांभाळली होती. त्यांच्याकडे पक्षातील वरिष्ठांनी



### जरांगे दादांची भूमिका निर्णायक ठरेल..!

लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांनी पक्षाशी एकनिष्ठ राहून विद्यमान खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. बीड मतदार संघातून सर्वाधिक मताधिक्य देण्यामध्ये त्यांनी नक्कीच खारीचा नव्हे तर सिंहाचा वाटा उचलला.हे वास्तव नाकारून चालणार नाही. यादरम्यान महायुतीच्या उमेदवाराला पराभूत करण्यासाठी आणि महाविकास आघाडीच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी मराठा आरक्षण योद्धा मनोज दादा जरांगे यांचे आणि संदीप क्षीरसागर यांचे निश्चितच संबंध आणि संपर्क आलेले असणार.कारण दोघांचे विचार वेगळे असले तरी उद्दिष्ट एकच होते. जरांगे दादांना भाजपाची जिरवायची होती तर संदीप भैयांना पक्षाचा उमेदवार निवडून आणायचा होता.आता लोकसभेत संदीप भैय्यांनी दिलेली साथ याची परतफेड विधानसभेत करण्याची वेळ येणार असल्याने मनोज दादा जरांगे पाटील काय भूमिका घेतात याकडे तर लक्ष वेधणार आहे.मात्र जरांगे दादांना आता संदीप क्षीरसागर यांना थेट विरोध करून सुद्धा चालणार नाही. कारण ते मराठा समाजाचे थेट जावई आहेत. जावयाला नाराज करून चालणार कसे ? आणि सर्वात महत्वाचे मराठा आरक्षण लढ्यामध्ये संदीप क्षीरसागर यांनी कायम सहकार्याची भूमिका घेतलेली होती आणि आहे. त्यामुळे येणारे निवडणूक रंगतदार होणार हे नक्की.

### ठाकरेंची सेना,काँग्रेसचे विचार आणि राष्ट्रवादीची वाढलेले ताकद संदीप क्षीरसागरांची विजयी नौका पार करणार ?

#### मी बीडचा, बीड माझे- आ.संदीप क्षीरसागर

मी बीडचा, बीड माझे बीडकरांशी असलेले माझे नाते कधीही तुटू शकणार नाही. आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरचंद्र पवार), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व मित्रपक्षांच्या महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार म्हणून माझी उमेदवारी घोषित झाली. मला उमेदवारी दिल्याबद्दल राष्ट्रीय अध्यक्ष मा.खा.शरदचंद्र पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील साहेब, खा. सुप्रियाताई सुळे यांच्यासह पक्षाचे सर्व नेते मंडळी यांचे आभार मानत असल्याच्या भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी आपल्या फेसबुक पोस्टच्या माध्यमातून व्यक्त केल्या.

#### मेटे मस्के गोरेंची ताकद वाढवेल

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात शिवसंग्रामच्या नेत्या ज्योतीताई मेटे भाजपाचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के आणि माजी नगराध्यक्ष दिलीप गोरे यांनी काही दिवसापूर्वीच शरदचंद्र पवार साहेबांचे नेतृत्व स्वीकारून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केलेला आहे हे तीनही नेते बीड मतदार संघात आपली ताकद आणि अस्तित्व पाळून आहेत त्यामुळे त्यांची ताकद संदीप क्षीरसागर यांना बळ वाढवणारी ठरणार आहे

जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिलेली आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार

(उर्वरीत पान २ वर)

### विधानसभा निवडणूक २०२४

## निवडणूक प्रक्रियेतील सर्वांनी जबाबदारीने कार्यवाही पार पाडावी

प्रतिनिधी । बीड

बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघातील निवडणूक प्रक्रियेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अधिक सक्षम व बिनचूकपणे जबाबदारीने त्यांच्यावर सोपवलेली कामे पार पाडावीत, अशा सूचना विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी केल्या जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभानिहाय कामकाजांचा आढावा आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी घेतला. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांनी



मतदारसंघनिहाय करण्यात आलेल्या सर्व कामकाजांची माहिती विभागीय आयुक्तांना दिली.

या बैठकीस छत्रपती संभाजी नगरचे उपायुक्त जगदिश मिनियार, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य

(उर्वरीत पान २ वर)

## भाजपच्या जिल्हाध्यक्ष पदी शंकर देशमुख यांची नियुक्ती

प्रतिनिधी । आष्टी

एकीकडे सर्वच पक्षात निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले जातं असताना भाजपने मात्र दोन पिढ्यापासून पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी एकनिष्ठ असलेल्या देशमुख कुटुंबाला न्याय दिला आहे. भाजपचे सरचिटणीस शंकर देशमुख यांची जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी अचानक राजीनामा देऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. त्यानंतर या पदावर कोणाची वर्णी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.दरम्यान शनिवारी दुपारी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शंकर देशमुख यांना त्यांच्या नव्या जबाबदारीचे पत्र दिले. शंकर देशमुख हे भाजपचे विद्यमान सरचिटणीस आहेत. माजीमंत्री पंकजा मुंडे, प्रीतम मुंडे यांचे निकटवर्तीय म्हणून देशमुख यांची ओळख आहे.



वडिलांपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपचा वारसा असणाऱ्या देशमुख कुटुंबातील शंकर देशमुख हे कारसेवक म्हणून बाबरी मस्जिद पतनाच्या वेळी आंदोलनात सक्रिय सहभागी होते. घरात भाजपचा वारसा असल्याने पक्षनिष्ठ म्हणून त्यांनी अनेकवेळा वेगवेगळ्या पदावर

(उर्वरीत पान २ वर)

## टपाली मतपत्रिकांची कार्यवाही अचूकपणे पार पाडा-शैलेश सूर्यवंशी




बीड : बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील अधिसूचित मतदार, ८५ वर्षांहून अधिक वय असलेले मतदार, मतदार यादीनुसार असलेले दिव्यांग मतदार, निवडणूक कर्तव्यार्थ नेमणुकीसाठी असलेल्या मतदारांसाठीच्या टपाली मतपत्रकांसाठी करावयाची कार्यवाही अचूकपणे पार पाडावी, अशा सूचना टपाली मतपत्रिका विभागाचे नोडल अधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हास्तरीय टपाली मतपत्रिका कक्षाच्यावतीने जिल्ह्यातील सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, टपाली मतपत्रिकांचे नोडल अधिकारी यांचे ऑनलाईन माध्यमातून प्रशिक्षण आज पार पडले. प्रशिक्षण श्री. सूर्यवंशी आणि निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी दिले. यावेळी

(उर्वरीत पान २ वर)

## बीड शहरात कमरेला गावठी पिस्टल लावुन फिरणाऱ्या इसमास स्था.गु.शा.ने केले जेरबंद

### एक गावठी गट्टा व दोन जिवंत काडतुस केले जप्त

प्रतिनिधी । बीड

मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी अवैध अग्निशस्त्र बाळगणारे इसमांची माहिती काढण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना सुचना दिल्या आहेत. त्यावरुन स्था.गु.शा. पथक बीड शहरात



पेट्रालिंग करीत असतांना पोलीस हवालदार मनोज वाघ यांना गुप्त बातमी मिळाली की, इसम नामे महादेव राज दोडके रा.सावतामाळी चौक याचेकडे पिस्टल असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली, तेव्हा श्री. उस्मान शेख पो.नि.स्थागुशा बीड यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले तेव्हा स्थागुशा

## केज विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमी वर पोलिसांचे पथसंचलन

प्रतिनिधी । केज

विधानसभा निवडणुकी च्या अनुषंगाने पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल,सीमा सुरक्षा दल, दंगल नियंत्रण पथक पोलिसांच्या वतीने उप विभागीय पोलीस अधिकारी कमलेश मीना यांच्या प्रमुख मार्गदर्शना खाली केज शहर,नांदुर घाट,विडा या गावामध्ये जवानांनी सशस्त्र पथ संचलन केले.केज पोलीस स्टेशन पासून जयभवानी चौक,मुख्य रस्ता तसेच नांदुरघाट व विडा या गावामध्ये पथसंचलन करण्यात



आले.विधान सभा निवडणुकीमध्ये मतदानाच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये.मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडावी यासाठी सशस्त्र पथ संचलन करण्यात आले.

या पथसंचलनात पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, सीमा सुरक्षा दलाचे

# बदामराव पंडितांच्या प्रचारासाठी उद्या सभा

### खा संजय राऊत, सुषमा अंधारे यांची तोफ धडाडणार


गेवराई (प्रतिनिधी)

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना महाविकास आघाडीची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांच्या प्रचारार्थ उद्या दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी गेवराई शिवसेना नेते खा संजय राऊत, शिवसेना उपनेते सुषमाताई अंधारे यांची तोफ धडाडणार आहे. याप्रसंगी खा बजरंग सोनवणे, खा ओमराजे निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बदामराव पंडित यांच्या प्रचारासाठी उद्या दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता गेवराई कृषी उत्पन्न समिती मोंढा मार्केट यार्ड गेवराई या ठिकाणी शिवसेना नेते संजय राऊत शिवसेना उपनेते सुषमा अंधारे खासदार बजरंग सोनवणे खासदार ओमराजे निंबाळकर यांची जाहीर सभा होणार आहे. याप्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख पुरुषोत्तम जाधव, राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष शेख महेबूब, माजी आरोगयमंत्री राजेश टोपे, शिवसेना सह संपर्कप्रमुख सुनील धांडे, शिवसेना जिल्हा समन्वयक बाळासाहेब अंभोरे, शिवसेना जिल्हा समन्वयक युधाजित पंडित, शिवसेना महिला जिल्हा संपर्कप्रमुख संपदाताई गडकरी, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट







गेवराई बाजार तळावर जाहीर सभा

जिल्हाध्यक्ष आ संदीप, क्षीरसागर, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजसाहेब देशमुख, आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष अशोक येडे, युवासेना जिल्हासमन्वयक पवन चव्हाण, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेदरे, शिवसेना गेवराई विधानसभा संपर्कप्रमुख सुरेश बावकर यांच्यासह मित्र पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे.

गोरगरिबांसाठी २४ तास झगडणाऱ्या आणि सामान्यांच्या हाकेला साथ देणाऱ्या बदामराव पंडित यांच्या विजयावर शिक्का मोर्तब करण्यासाठी आयोजित केलेल्या या जाहीर सभेला गेवराई विधानसभा मतदारसंघातील तमाम मतदार बंधू-भगिनी, शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, युवक-युवती, कार्यकर्ते आणि नागरिकांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख अजय दाभाडे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड, काँग्रेस तालुकाप्रमुख महेश बेदरे, किसान सेना तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, शिवसेना अल्पसंख्यांक सेल तालुकाप्रमुख तय्यब पठाण यांनी केले आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# कायदा गतीचा पाळा...

२०२३-२४ या आर्थिक वर्षात देशात ७३ हजार बालविवाह रोखण्यात यश आले. १७ राज्ये आणि २६५ जिल्ह्यांमध्ये हे विवाह रोखण्यात आले. त्यासाठी, विविध संस्था तसेच पंचायतींनी प्रयत्न केल्याचे राष्ट्रीय बालहक्क आयोगाने म्हटले आहे.

भारतात दरवर्षी निदान १५ लाख बालविवाह होतात. याचा अर्थ, ३० लाख कुटुंबांचा या विधीत थेट संबंध असतो. नातलग आणि मित्र मोजले तर काही कोटी कुटुंबे अशा विवाहांत सहभागी होत असतील. यात लोकप्रतिनिधीही असणार. लोकप्रतिनिधी तसेच पोलिस व इतर यंत्रणा यांना हे लक्षावधी बालविवाह रोखण्यात मुळीच यश येत नाही. अशावेळी केवळ कायदे किंवा शिक्षा; यापेक्षाही समाजाला शहाणे करणे हा सर्वोच्च न्यायायलाला दूरचा पण खात्रीचा मार्ग वाटला तर नवल नाही.

२०२३-२४ या आर्थिक वर्षात देशात ७३ हजार बालविवाह रोखण्यात यश आले. १७ राज्ये आणि २६५ जिल्ह्यांमध्ये हे विवाह रोखण्यात आले. त्यासाठी, विविध संस्था तसेच पंचायतींनी प्रयत्न केल्याचे राष्ट्रीय बालहक्क आयोगाने म्हटले आहे. इतके विवाह रोखले असतील तर एकूण किती विवाह पार पडले असतील, याचा अंदाज करणे अवघड नाही. याचे कारण, गेल्या पाच वर्षांत बेकायदा बालविवाहांच्या प्रत्यक्ष दाखल गुन्ह्यांची संख्या चार हजारही नाही. देशभरात इतके बालविवाह तर सरासरीने रोज लागत असतील. १८ वर्षांखालची मुलगी आणि २१ वर्षांखालचा मुलगा यांचे लग्न म्हणजे बालविवाह.

दोघांपैकी एकाचेही वय कमी असले तरी तो कायद्याने गुन्हा आहे आणि दोघांचेही पालक, लग्न लावणारे पुरोहित शिक्षेस पात्र आहेत. मात्र, यात पोलिसांनी गुन्हे किंवा खटल्यांचे प्रमाण वाढविण्यापेक्षाही समाजाने शहाणे होणे, हे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वातील खंडपीठाला महत्त्वाचे वाटते. न्यायमूर्तींचे हे निरीक्षण स्वातंत्र्यपूर्वकाळात महाराष्ट्रात झालेल्या 'आधी स्वातंत्र्य की आधी सुधारणा' या चर्चेची आठवण करून देणारे आहे. स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाली तरी बालविवाह हा सर्वार्थाने मुला-मुलींचे आणि समाजाचे अनेक पदरी नुकसान करतो; हे समाजाला पुरते पटलेले नाही. ही केवळ खेड्यांमधील समस्या नाही. मोठ्या शहरांत सुशिक्षित कुटुंबांतही असे बालविवाह झाले आणि होत असतात. या विषयात लोकशिक्षण किती मोलाचे आहे, हे यावरून लक्षात यावे.

विवाहासंबंधी सर्वंकष कायदा करताना विविध धर्मांचे व्यक्तिगत कायदे मागे ठेवायला हवेत आणि भारतात कोणत्याही जाती किंवा धर्मात जन्म झालेल्या मुला-मुलींना विवाहाच्या वयाची मर्यादा समानच हवी. समान नागरी कायद्याबद्दलच्या राज्यघटनेतील उद्दिष्टांमध्ये विवाहविषयक व्यक्तिगत कायद्यांमध्ये सुसंगती आणणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने वयोमर्यादेचा नियम सर्व धर्मांचे व्यक्तिगत कायदे ओलांडून सर्वांना समान करण्याची मागणी फेटाळून लावली आहे. सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश समान नागरी कायद्याच्या विरोधात जाणारा नसून तो 'संसद या विषयात आधीपासूनच लक्ष घालत असल्याने आणि संसदेसमोर संबंधित विधेयक असल्याने' दिलेला उचित आदेश आहे. सर्व धर्मांचे व्यक्तिगत कायदे बाजूला ठेवून सर्वांसाठी समान वयोमर्यादा व इतर आनुषंगिक बाबी ठरविणारे विधेयक गेली तीन वर्षे संसदेसमोर आहे. त्यामुळेच, सन २००६ मध्ये मंजूर झालेला बालविवाह प्रतिबंधक कायदा सर्व धर्मांच्या व्यक्तिगत कायद्यांना ओलांडून सर्वांना लागू करावा, ही मागणी सर्वोच्च न्यायालयाने विचारात घेतलेली नाही.

# पॅरालिसिस काय आहे ?

पॅरालिसिस स्ट्रोक अर्थातच पक्षाघात (अर्धांगवायु) चे गंभीर स्वरूप आणि उच्च दर अधोरेखित करण्यासाठी, रोगाच्या प्रतिबंध आणि उपचारांविषयी जागरूकता वाढवण्यासाठी आणि बरे झालेल्यांसाठी अधिक चांगली काळजी आणि सहाय्य सुनिश्चित करण्यासाठी जागतिक पॅरालिसिस (स्ट्रोक) दिवस २९ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. यासंदर्भात न्यूरो सर्जन डॉ. विशाल पिंगळकर यांनी पॅरालिसीस (स्ट्रोक) संदर्भात दिलेली माहिती.

पॅरालिसीस स्ट्रोक संभाव्य प्राणघातक नर्व्ह- संबंधित वैद्यकीय स्थिती आहे, जी मेंदूच्या एखाद्या भागाला रक्तपुरवठा थांबतो तेव्हा उद्भवतो. जलद आणि आक्रमक वैद्यकीय उपचार मेंदूला कायमस्वरूपी नुकसान आणि अक्षमतेपासून वाचवू शकतात. चिन्हे आणि लक्षणे :- पॅरालिसिस (स्ट्रोक) ची चिन्हे आणि लक्षणे भिन्न असतात आणि अचानक दिसतात आणि प्रत्येक व्यक्तीमध्ये वेगळी असतात. त्यांना एफ. ए. एस. टी. म्हणून ओळखले जाते. चेहरा (फेस) - डोळा आणि तोंड एका बाजूला वाकणे

पॅरालिसिस


स्वरूप, लक्षणे आणि उपचार

आणि हसण्यास असक्षम होणे. हात (आर्म) - दुर्बलता किंवा सौम्यतेमुळे दोन्ही हात उचलण्यात अक्षमता, बोलणे (स्पीच) अस्पष्ट उच्चारण किंवा बोलण्याची अक्षमता असू शकते. वेळ (टाइम) - त्वरित वैद्यकीय मदत बोलवणे. इतर लक्षणांमध्ये याचा समावेश आहे: एक बाजू किंवा विशिष्ट भागाला संपूर्ण पक्षाघात उदा. चेहऱ्याची एक बाजू, अस्पष्टता किंवा दृष्टीक्षेप हानी. चक्कर येणे, गोंधळ, समतोल आणि समन्वय समस्या, गिळताना अडचणी, शुद्ध हरपणे, शरीराची एक किंवा दोन्ही बाजू सुन्न होणे.

पॅरालिसिसचे कारण काय ? मेंदूच्या रक्तपुरवठ्यात अडथळा हा इस्किमिक स्ट्रोकचा परिणाम आहे. रक्तवाहिन्यांमधील भिंतींवर प्लाक (कोलेस्टेरॉल आणि कॅल्शियम) ) जमा झाल्यामुळे अडथळा येतो. मेंदूमध्ये धमनी तुटणे हे हॅमरेजिक स्ट्रोकचे कारण आहे (सेरेब्रल किंवा इंट्राक्रैनियल हॅमरेज). उच्च रक्तदाब हॅमराजिक स्ट्रोकच्या

प्रमुख कारणांपैकी एक आहे.

क्षणिक इस्किमिक अ‍ॅटेकला मिनी-स्ट्रोक



किंवा चेतावणी स्ट्रोक म्हणून देखील ओळखले जाते, धमनीच्या आंशिक अडथळ्यामुळे होते. हे एका तासापेक्षा कमी काळ टिकते आणि आगामी गंभीर स्ट्रोकची चेतावणी देते. निदान आणि उपचार :- लक्षणांवर आधारित, वैद्यकीय इतिहास, कौटुंबिक इतिहास आणि शारीरिक तपासणी करून डॉक्टर निदान करतात. चेहरा, हात आणि पाय यांची संवेदना, धूसर दृष्टी: गोंधळ आणि बोलण्यात अडचण याची तपासणी केली जाते. रक्त तपासणी, पल्स रेट आणि रक्तदाब तपासणे, सीटी स्कॅन, सीटी अँजियोग्राम, एमआरआय स्कॅन, गिळण्याची चाचणी, कॅरोटीड अल्ट्रासाऊंड आणि इलेक्ट्रोकार्डियोग्राम केले जाते. इस्किमिक स्ट्रोकमध्ये थ्रॉम्बोलायसिस, थ्रॉम्बेक्टॉमी, अ‍ॅन्टप्लेटलेट थेरपी, अ‍ॅन्टिकोग्युलंट थेरपी, अ‍ॅन्टी-हाइपरटेन्सिव्ह ड्रग्स, स्टेटिन्स आणि कॅरोटीड एंडार टेरेक्टॉमी यांचा समावेश आहे. हॅमरेजिक स्ट्रोकचे शस्त्रक्रियेद्वारे मेंदूमध्ये पसरलेले रक्त काढून आणि मेंदूमध्ये वाढलेला दबाव व्यवस्थापित करून उपचार केले जातात. व्यायामाने धोका टाळू शकतो :- दररोज व्यायाम केल्याने रक्तदाब नियंत्रणात ठेवता येऊ शकतो. उच्च रक्तदाब हा पक्षाघात (स्ट्रोक) चा धोका वाढवणाऱ्या घटकांपैकी एक आहे. त्यामुळे पक्षाघात होण्यापासून रोखण्यासाठी रक्तदाब नियंत्रणात ठेवणं आवश्यक आहे. इतकंच नाहीतर नियमित व्यायाम केल्यास लठ्ठपणा, कोलेस्टेरॉल आणि मधुमेह सुद्धा टाळता येऊ शकतो. अनेक सर्वेक्षणातून समोर आलं आहे की, व्यायामामुळे अनेक आजारांना दूर ठेवता येऊ शकते. नियमित व्यायाम केल्याने हृदयाची कार्यक्षमता वाढते. दिवसातून कमीत कमी अर्धा तास तरी व्यायाम करावा. मुळात, आपल्याला आठवड्यातून पाच वेळा व्यायाम करणे आवश्यक आहे. पक्षाघाताचा झटका आलेल्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व्यायामाची निवड करा. योग्यपद्धतीने व्यायाम करणे मदत करू शकतो. नियमित व्यायामाबरोबरच संतुलित आहार घेणंही आवश्यक आहे. याशिवाय धुम्रपान व मद्यपानाचे व्यसन करणं टाळावेत. कारण पक्षाघातामुळे जीवघेणे परिणाम रूग्णाला सहन करावे लागते.

**-डॉ. विशाल पिंगळकर**
(न्युरो सर्जन)
विश्व न्युरो स्पाईन, सर्जिकल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, शिवाजी नगर पोलीस स्टेशन जवळ बार्शी रोड बीड.

# २१ ऑक्टोबर २४ रोजी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कर्मचाऱ्यांचे विशेष निवडणूक प्रशिक्षण संपन्न

**प्रतिनिधी** । जालना

दि. २६/१०/२०२४रोजी, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या प्रशिक्षणास गैरहजर असलेल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी वर्ग १, २, ३ कर्मचारी यांचे विशेष निवडणूक प्रशिक्षण हे तहसील कार्यालय जालना येथे आज पार पडले.सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार श्रीमती छाया पवार यांचे विशेष उपस्थितीत सदर प्रशिक्षण पार पडले,यावेळी उपस्थित प्रशिक्षणार्थी यांना त्यांचे मतदान केंद्रस्तरीय जवाबदाऱ्या व कर्तव्ये, आदर्श आचारसाणहीतेचे




काटेकोर पालन करणे, साहित्य स्वीकृती करतांना घ्यावयाची काळजी, मतदानसाठीचे उण , इण , ततझ-ढ यांची तपासणी कारणे व ते कसे हाताळावे यासह मतदान प्रदत्त मतदान, मतपत्रिका, उमेदवार प्रतिनिधी, मतदार नोंदवही, केंद्राक्षांची दैनंदिनी, विविध घोषणापत्रे, मतदान केंद्राची रचना कशी असावी, मॉक पोल, याबाबत सविस्तर माहिती व प्रशिक्षण दिले, तसेच मतदान केंद्रात कोण कोण प्रवेशपात्र असेल, मतदान केंद्रात फक्त मतदान केंद्राध्यक्ष व सूक्ष्म निरीक्षक यांनाच मोबाईल नेण्यासाठी परवानगी असेल मात्र सदर मोबाईल हा सायलेंट असावा. भारत निवडणूक आयोगाने ठरवून दिलेले /निर्गमित केलेले मतदान करण्यासाठी चे मतदाराला आवश्यक असलेले १२ पुरावे याबाबत ही सविस्तर माहिती देण्यात आली, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कर्मचारी यांना नेमून दिलेली कामे त्यांनी अचूक पार पाडावी, तसेच दर २ तासांनी झालेले मतदान टक्केवारी व हिशेब क्षेत्रीय अधिकारी यांना वेळोवेळी कळवावा. यासह प्रत्यक्ष मतदान वेळेत करावयाची कामे, अडचणी, समस्या याबाबत सविस्तर माहिती, सूचना व त्याबाबतीत प्रशिक्षण देण्यात आले, यावेळी सहा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती छाया पवार, परूल तहसीलदार निवडणूक व्ही एस घुगे, श्री पेरके, श्री स्तिह पडघन, व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# आमदार संदीप क्षीरसागर यांना राष्ट्रवादीची उमेदवारी मिळावी - इरफान शेख

**प्रतिनिधी** । बीड

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप भैया क्षीरसागर यांनी पक्षाशी आणि नेतृत्वाशी ठेवलेली इमानदारी लक्षात घेता त्यांची निष्ठा पाहून पक्षाने आणि पक्षाच्या नेतृत्वाने बीड विधानसभा निवडणुकीसाठी पुन्हा एकदा तिकीट देऊन संधी द्यावी. यासाठी हजरत टिपू सुलतान युवा मंच चे अध्यक्ष



इरफान शेख पाली सर्कल यांनी जुम्मा नमाज मध्ये दुवा केली आहे.

# धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून परळीत अल्ट्राटेक सिमेंट कंपनी उभारणार ६०० कोटींचा अतिरिक्त प्रकल्प

**प्रतिनिधी** । परळी

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीला दिलेल्या विश्वासामुळे कंपनीने त्यांच्या परळी येथील सिमेंट ग्रायडिंग युनिटच्या उत्पादन क्षमतेमध्ये पाच पटीने वाढ करण्याचा निर्णय घेतला असून याठिकाणी सुमारे ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक कंपनीने दोन टप्प्यात करणार असल्याचे जाहीर केले आहे.

या उद्योगामुळे अल्ट्राटेक या जागतिक दर्जाच्या कंपनीचे अतिरिक्त युनिट परळीत उभा राहणार असून त्याद्वारे मोठ्या प्रमाणात स्थानिकांना रोजगार निर्मिती होणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी यांचे शिष्टमंडळ परळी येथे धनंजय मुंडे यांच्या भेटीला आले होते, यावेळी झालेल्या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाली असून, कंपनीने क्षमता वाढीसाठी दि.२४ रोजी संपन्न झालेली पर्यावरण जनसुनावणी पार पडल्यानंतर परळी येथील युनिट साठी दोन टप्प्यांत अतिरिक्त ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यास मान्यता दिली असल्याचे कंपनीच्या वतीने कळविण्यात आले आहे.या आधी देखील धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी वैजनाथ शहरालगत इंडिया सिमेंट कंपनीने

## स्थानिकांना मोठ्या प्रमाणात मिळणार रोजगार



सदरील युनिट सुरू केले होते. त्याद्वारे देखील मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झालेली आहे.

त्यानंतर आता जागतिक दर्जा प्राप्त असलेली अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या या मोठ्या गुंतवणुकीमुळे मोठ्या प्रमाणात विविध इतर पूरक उद्योगांना चालना मिळणार असून स्थानिकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती देखील होणार आहे. या गुंतवणुकीसाठी मान्यता दिल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीच्या संचालक मंडळाचे आभार मानले आहेत.

## पान १ वरून...

### आण्णांना विजयी करण्यासाठी...

दळणवळण सुकर केले. तसेच अनेक गावांत जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मतदारसंघात अनेक बंधारे बांधून जलसिंचन करण्याचे काम केले आहे.

तर गोरगरीब लोकांना आपल्या हक्काचे राशन मिळावे म्हणून प्रशासकीयस्तरावर सातत्याने प्रयत्न करत राशन वितरण व्यवस्था सुरळीत करून आज मतदारसंघातील प्रत्येक कार्ड धारकांना हाक्काचे राशन मिळत आहे. त्यामुळे जनतेने पुन्हा आग्रह करत आ.लक्ष्मण आण्णांना विधानसभा निवडणुकीत उभा केले आहे. तरी आण्णांना निवडून आण्ण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आव्हान शिवराज पवार यांनी बैठकी दरम्यान बोलतांना केले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रचारासाठी तसेच निवडणूक जिंकण्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या संपर्क कार्यालयात युवानेते शिवराज पवार यांच्या उपस्थितीत आज २६ रोजी सकाळी नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आ.लक्ष्मण पवार यांनी मतदारसंघात दहा वर्षांत केलेले काम जनतेत पर्यंत गेले पाहिजे. यासाठी प्रत्येकांनी गावागावात चर्चा करून भविष्यातील उर्वरित विकास काम करण्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या विजयासाठी कार्यक्रत्यांनी कामाला लागावे असे आव्हान शिवराज पवार यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना बैठकी दरम्यान केले आहे. यावेळी दादासाहेब गिरी,मधुकर वादे,ब्रम्हदेव धुरंधरे,संजय इगळे,कानगुडे आप्पासाहेब, धम्मपाल सौदरमल, भरत गायकवाड, विठ्ठल मोटे,मुन्ना शेठ, जुनेद बागवान, अनिल आप्पा शेट्टे, रशीद बागवान, सचिन वावरे,बद्दोदिन, पिटु साळवे, लक्ष्मण खरात, बाबा खरात, दशरथ पंडीत, करण जाधव, आदी उपस्थित होते

मतदारसंघात गेली काही दिवसा पासुन आ.लक्ष्मण पवार यांनी निवडणूक लढवणार नाही अशी घोषणा केली त्यानंतर मतदार संघातील जनते मोठ्या प्रमाणात चल बीचल निर्माण झाली तर अनेक कार्यक्रते पदाधिकारी यांनी उपोषणांचा निर्णय घेतला होता त्यामुळे आ.लक्ष्मण पवार यांनी बैठक घेऊन सर्वाशी संवाद साधत आपली भुमीका व्यक्त केली होती त्यावर सर्वांनीच आण्णा तुम्ही निवडणूक लढवली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली सर्वांच्या मताने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी अपक्ष उमेदवार म्हणून विधानसभा निवडणुक लढणार असल्यांचे जाहीर केला त्यामुळे मतदारसंघातील जनतेसह कार्यक्रत्यांनी निर्णयांचे स्वागत केले आहे.

### उमेदवारीवरून सुरू..

पक्षाने बीड विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी आ.संदीप क्षीरसागर यांना दिली आहे. आता संदीप क्षीरसागर हे बीड विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असतील. आ.संदीप क्षीरसागर यांच्या उमेदवारीबाबत उलट-सुलट चर्चा असताना उमेदवारी शेवटी आ.क्षीरसागरांनाच मिळाल्याने एकनिष्ठेला न्याय मिळाला अशी भावना सामान्य लोक करत आहेत.

विरोधाचे चक्रव्यूह अखेर भैय्यांनी तोडलेच !

## पान १ वरून...

आ.संदीप क्षीरसागरांना एकटे पाडून त्यांची उमेदवारी अडविण्यासाठी बीड जिल्ह्यापासून मुंबईपर्यंत अनेक प्रयत्न झाले. अनेकांनी त्यांचे संपूर्ण सामर्थ्य पणाला लावले. पण शेवटी विजय हा विचार आणि एकनिष्ठतेचाच झाला. लोकप्रिय आणि जनसामान्यांशी थेट कनेक्ट असलेल्या युवा नेतृत्वाला पुन्हा संधी मिळाल्याने जनसामान्यांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

### भाजपच्या जिल्हाध्यक्ष...

जबाबदारी पार पाडली आहे. बूथ पासून ते लोकसभेपर्यंत प्रत्येक निवडणुकीत पक्षाचं काम हिरीरीने करणारे म्हणून शंकर देशमुख यांची पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर ओळख आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंकजा मुंडे यांच्यासोबत कौटुंबिक संबंध असलेल्या देशमुख यांना पक्षाने निष्ठेचे फळ दिले आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्वस्तरातून त्यांचे अभिनंदन होतं आहे.

### निवडणूक प्रक्रियेतील...

जीवने, जिल्हा पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, प्र. अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओमकार देशमुख, प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील, तहसीलदार अविनाश शिंगटे, तसेच सर्व विभागाचे नोडल अधिकारी यांची उपस्थिती होती. तर बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा क्षेत्रातील निवडणूक निर्णय अधिकारी ऑनलाईन माध्यमातून उपस्थित होते.

सहाही मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने प्रशासनाने केलेली तयारी, टपाली मतपत्रिका, स्वीप कार्यक्रम याबाबत सविस्तर माहिती जिल्हाधिकारी यांनी विभागीय आयुक्त यांना दिली. विभागीय आयुक्तांनीही निवडणूक यंत्रणेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कामाचे कौतुक करत निवडणूक प्रक्रिया अचूकपणे राबविण्याच्या सूचना यावेळी केल्या.

### टपाली मतपत्रिकांची..

जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कृष्णा शिंदे, जिल्हा सहायक निबंधक ए.बी. अटुळे, जिल्हा सूचना अधिकारी भाऊसाहेब बांगर, तहसीलदार अविनाश शिंगटे, तंत्रज्ञ महादेव भाकरे यांची उपस्थिती होती.

प्रशिक्षणात इटीपीबीएमएस या इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारे सेवा मतदार (संरक्षण दलातील मतदार) यांच्या मतपत्रिका, अधिसूचित मतदार, ८५ वर्षांवरील मतदार, दिव्यांग मतदार, मतदार यादीनुसार दिव्यांग मतदार आणि मतदानादिवशी मतदान केंद्रांवर जाऊन मतदान न करू शकणाऱ्या निवडणूक कर्तव्यार्थ नेमणूक केलेल्या मतदारांच्या मतपत्रिकांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शन् श्री. सूर्यवंशी, श्री. कांबळे, श्री. बांगर यांनी केले. प्रशिक्षणास उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांच्या शंकांचे निरसनही मार्गदर्शकांनी यावेळी केले.

# ट्विंकलिंग स्टार स्कूलच्या चिमुकल्याने बनवल्या मातीच्या पणत्या



**प्रतिनिधी** । बीड

बीड शहरातील सुप्रसिद्ध असणाऱ्या ट्विंकलींग स्कूल च्या गया नगर प्री -प्रायमरी स्कूल येथे चिमुकल्या विद्यार्थ्यांकरिता दिवाळीनिमित्त अभिनव उपक्रम पणती बनवा, पणती रंगवा चे आयोजन करण्यात आले होते.या शाळेत दिवाळीनिमित्त विविध आकाराच्या पणत्या बनवणे व रंगवणे या उपक्रम घेण्यात आला होता.सदर उपक्रमात इयत्ता नर्सरी ते सिनियर केजी तील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मातीपासून पणत्यांचे विविध आकार बनवण्याचा प्रयत्न करून पणत्यांना वॉटर कलरचा वापर करून रंगविले.

पणती बनवण्याची कृतीसह माहिती नीता शिंदे तसेच पणतीवरील रंगकामाची कृतीसह माहिती रेखा उदगीरे व वर्षा त्रिपाठी यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. दिवाळी हा दिव्यांचा सण आहे. विद्यार्थ्यांनी रंगवलेल्या सर्व विविध आकाराच्या पणत्या स्कूलमध्ये होणाऱ्या दीपोत्सवाच्या कार्यक्रम वेळी लावण्यात येणार असल्याचे स्कूलचे अध्यक्ष श्री गणेश मैड यांनी यावेळी सांगितले.चिमुकले विद्यार्थी माती पासून पणत्या बनविताना त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता .या उपक्रमाचे पालक वर्गातून कौतुक करण्यात आले. या उपक्रमाचे स्कूलचे अकॅडमीक डायरेक्टर श्री कोमाथ भास्करन, प्राचार्या जयश्री कदम, उप प्राचार्य दीपक झा, उप प्राचार्य कृष्णकुमार यांनी कौतुक केले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी नीता शिंदे ,रेखा उजगिरे व वर्षा त्रिपाठी यांनी पुढाकार घेतले.

# राजापूर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी गणेश पाटील हातनुरे यांची बिनविरोध निवड

**प्रतिनिधी । धर्माबाद**

धर्माबाद तालुक्यातील राजापूर येथील ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी गणेश पाटील हातनुरे यांची शुक्रवारी बिनविरोध निवड करण्यात आली.गणेश पाटील यांची बिनविरोध निवड जाहीर होताच समर्थकांनी फटाके व गुलाल उधळत आपला आनंद साजरा केला.

राजापूर ग्राम पंचायतीच्या तात्कालीन सरपंच यांना ग्रामसभा व मासिक सभा न घेतल्यामुळे कलम ७ व ३६ चे उल्लंघन केल्या मुळे मा, अभिजित राऊत जिल्हाधिकारी नांदेड १२/१/२३ रोजी अपात्र ठरविण्यात आल्याने निलेवार यांनी मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे अपिल दाखल केली.त्या नंतर मा, न्यायालयाने.मा, जिल्हाधिकारी यांच्याकडे फेर चौकशी करून प्रकटन निकाली काढण्याचे आदेश दोन वेळा दिले.दि.०१/०८/२४ व दि ०४/१०/२४ रोजी मा. जिल्हाधिकारी साहेबांनी वादी यांचा बाजुचे निकाल दिला.त्यानंतर प्रतिवादी यांनी फेर निर्णयाच्या विरोधात मा. उच्च न्यायालयात फेर याचीका दाखल केली.दि २३/१०/२४ सुनावणी झाली त्यात मा . उच्च न्यायालयाने सरपंच पदाची निवडणूक घ्या दि,१३/११/२४ पर्यंत पदभार दिले जाणार नाही अस्या आदेशाने शुक्रवारी ग्राम पंचायत राजापूर कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली.यावेळी सरपंच पदासाठी गणेश पाटील यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडळ अधिकारी वर्शा कुलकर्णी , तलाठी गगांसागरे, ग्रामसेवक सोनटक्के. पोलिस निरीक्षक



बाळासाहेब रोकडे.व पोलिस कर्मचारी .यावेळी उपस्थित होते . सरपंच पदी गणेश पाटील हातनुरे यांची निवड झाली आसे कळविले आहे.यावेळी ग्रामपंचायत सदस्य पंचफुला माधवराव कोंडाळे, लक्ष्मीबाई अरविंद हानमंते,व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सरपंच पदी निवड जाहीर झाल्या नंतर तालुक्यातील अनेक मान्यवर मंडळी गणेश पाटील यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# एसबीआय बँकेत शाखाधिकार्यांनी केले पेन्शनर्सना मार्गदर्शन

**प्रतिनिधी । धर्माबाद**

येथील एसबीआय बँकेचे शाखाधिकारी राजेश रेगुल यांनी येथील पेन्शनर्स कर्मचाऱ्यांची बैठक दि.२४ ऑक्टोबर रोजी घेऊन त्यांच्या अडी अडचणी विचारून घेतले आहेत. पेन्शनर्स ला कोणकोणत्या सवलती आहेत याची माहिती देवून कोणत्याही अडचणी आसल्यास माझ्याशी संपर्क साधावा असे आश्वासन दिले आहे.

पेन्शन लोन वयाच्या ७६ व्या वर्षापर्यंत घेता येते, गोल्ड लोन घेणे, ज्यांनी नॉमिनेशन केले नाही अशांनी फार्म भरून द्यावा, पेन्शनर्स साठी वेगळी लाईन करणे, फसवणूक होणार नाही



यांची काळजी घेणे इत्यादी बाबीवर सविस्तर मार्गदर्शन केले आहे. यावेळी फिल्ड ऑफिसर अरहमखान यांनी अनेक योजनेची माहिती दिली.

बैठक सुरू करण्यापूर्वी पेन्शनर असोसिएशनचे ता. सचिव कै. जी.बी.पांचाळ यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.पेन्शनर्स असोसिएशनचे ता. अध्यक्ष जी.पी. मिसाळे, जि. सदस्य शेख हुसेन चौधरी, बी.पी.कुदाळे यांचा शाल पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला आहे. या बैठकीस गोपाळराव गुब्बी, शंकरराव कामीनवार, गंगाधर चातरमल, रणजीत पालकृतवार, दिगंबरराव कदम, वाघमारे सिद्धार्थ, सय्यद खय्यायामोद्दीन, सुरेश देवे, टी. जी. तुरे, सिताराम कासराळीकर, यांची प्रमुख उपस्थिती होती, बी.पी. कुदाळे यांनी आभार मानले.

# पाटोदा ग्रामीण रुग्णालयात नेत्र तपासणी विभाग सुरू करण्याची मागणी



**प्रतिनिधी । पाटोदा**

येथील ग्रामीण रुग्णालयात अनेक दिवसांपासून स्त्रीरोगतज्ज्ञ, नेत्ररोगतज्ज्ञ उपलब्ध नसल्यामुळे तपासणी बंद आहे. त्यामुळे गोरगरीब रुग्णांना उपचारासाठी पैसे मोजावे लागत आहेत. याकडे तातडीने लक्ष घालून ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टर आणि नेत्र तपासणी विभाग सुरू करावा, अशी मागणी सकळ मराठा मदत फाउंडेशनच्या वतीने प्रशासनाकडे करण्यात आली. यासंदर्भात सुरेंद्र तिपटे यांनी निवेदन दिले.

# गेवराई विधानसभा मतदार संघातील महा विकास आघाडीचे उमेदवार बदामराव पंडित यांना विजयी करण्याचा पिंपळनेर सर्कल शिवसैनिकांचा निर्धार

## जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर..

**प्रतिनिधी । बीड**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), काँग्रेस व मित्र पक्ष,महाविकास आघाडी गेवराई विधानसभेचे अधिकृत उमेदवार बदामराव आबा पंडित यांच्या प्रचारार्थ पिंपळनेर येथील सिद्धिविनायक गणपतीस नारळ फोडत दर्शन घेऊन आज विधानसभा मतदारसंघात प्रचारास प्रारंभ करत प्रचाराच्या पहिल्या दिवशी पिंपळनेर सर्कल मधील नाथापूर, रंजेगाव,, शहाजानपूर, लोणी,रामगाव, सांडरवण, लिंबारुई, पाटेगाव, पिंपळादेवी, बेडूकवाडी, मुगगांव, सूर्डी (थोट),बोरदेवी, नबापूर, केसापुरी, परभणी, ताडसोन्ना,

घाटजवळा, वलीपुर, पिंपळनेर या सर्व गावांमध्ये माजी मंत्री बदामराव आबा पंडीत व शिवसेनेचे दोन्ही जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉर्नर बैठका पार पडल्या.लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी महाराष्ट्रात पुन्हा एकदा जनतेच्या विचारांचे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आणण्यासाठी गेवराई विधानसभा



मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण मला मतदान रुपी आशीर्वाद देऊन आमदार म्हणून मला संधी द्या असे आवाहन भावी आमदार बदामराव पंडीत यांनी मतदार बांधवांशी केले.

याप्रसंगी बोलताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर म्हणाले कि येणाऱ्या काळात बीड जिल्ह्यामध्ये अनेक लोकांचे प्रवेश महाविकास आघाडीमध्ये होत आहेत आपण बघितले असेल या राज्यामध्ये व देशामध्ये मोदी, फडणवीस आणि शिंदे यांचे सरकार होते या सरकारने सर्व सामान्य माणसाला, शेतकऱ्याला देशोधडीला लावण्याचे काम केले आहे. शेतकऱ्यांच्या कापुस, सोयाबीन असे अन्य पिकांचे भाव कवडीमोल करून ठेवले आहे. म्हणून या सरकारला कायमच घरी बसवण्यासाठी येणाऱ्या २० तारखेला मशाल या चिन्हासमोरील बटन दाबून माजी मंत्री बदामराव आबा पंडित यांच्या रूपाने महाविकास आघाडीला आशीर्वादरुपी मतदान करून जास्तीत जास्त लीडने आमदार करायचे आहे.

जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनीही सर्वांना मार्गदर्शन करत आपल्या सर्वांच्या हक्काचे लोकनेते म्हणजेच बदामराव आबांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणावे.याप्रसंगी बीड तालुक्याचे तालुकाप्रमुख गोरख आण्णा सिंघण, माजी जिल्हा परिषद सभापती पंढरीनाथ बापू लगड,सखाराम तात्या मोहिते, कैलासजी राठोड, प्रभू तात्या नांदे, विठ्ठल नांदे, बाळासाहेब नागटिळक, राम शिंदे, विनोद गूंड पाटील, अजय गायकवाड, ऋषिकेश गिरी, सोफीयान शेख,शकील भाई पठाण, सुग्रीव सोजे, ऋषिकेश माठे महाराज ,रुद्रा मते, महेश मते,अमोल देवडकर, अश्विन लांडे, अशोक घुमरे, अर्जुन वाघ, राजेंद्र सातपुते, झुंबर जाधव, मारोती जाधव, पटू इंगोले, कैलास थोटे, बोरदेवी चे सरपंच रवी आरसुळ, राजू नाडे, सिद्धेश्वर नरवडे, उमेश आनेराव, गणेश नरवडे, संजय बप्पा नरवडे, अली शेठ कुरेशी, गोविंद शिंदे सह सर्व गावातील मतदार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामलिंग पतसंस्थेकडून सभासदांना १५ टक्के लाभांशासह किराणा कीटचे वाटप

**प्रतिनिधी । वडवणी**

बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात नामांकित असलेल्या वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था मर्या.ता.वडवणी यांच्या वतीने दि.२८ सप्टेंबर २०२४ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषित केल्याप्रमाणे प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी दिपावली सणाच्या पूर्वी संस्थेच्या सभासदांना १५ टक्के प्रमाणे एकुण १३ लक्ष ५४ हजार ४७४ रुपये लाभांश रक्कमेच्या वाटपाचा तसेच सभासदांसाठीच्या एकुण १० लक्ष रुपये रक्कमेच्या दिपावली फराळ किराणा कीटांचे वाटपाचा शुभारंभ दि.२२ ऑक्टोबर २०२४ मंगळवार रोजी संस्थेचे संचालक मंडळ व मान्यवरांच्या हस्ते उपस्थित सभासदांना लाभांश व किराणा कीट देत करण्यात आला. तरी ज्या सभासद बांधवांचे लाभांश व किराणा कीट घेवून जाणे बाकी आहे अशांनी पतसंस्थेत येवून आपली लाभांश रक्कम व किराणा कीट हस्तगत करावी असे आवाहन चेअरमन नारायणराव डिगे यांनी केले आहे. दरम्यान रोख लाभांशासह मोठ्या प्रमाणात सणानिमित्त फराळ बनवण्यासाठी साहित्य असलेल्या किराणा कीट मिळाल्याने सर्व सभासदांची यंदाची दिवाळीही आणखीनच गोड झाली असून त्यांच्या आनंदात अधिकची भर पडली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, संपूर्ण बीड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात नामांकित असलेल्या वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था मर्या.ता.वडवणी यांच्या वतीने दि.२८

## सभासदांची दिवाळी गोड झाल्याने आनंदात भर



सप्टेंबर २०२४ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत तरतूद व घोषित केल्याप्रमाणे प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी संस्थेच्या सभासदांना १५ टक्के लाभांश रक्कम व दिवाळी सणासाठी फराळ किराणा कीटचे वाटप करण्याचे सप्टेंबर महिन्यातील वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर करण्यात आले होते. त्याप्रमाणे आता दिपावली सणाच्या पूर्वीच संस्थेच्या सभासदांना १५ टक्के प्रमाणे एकुण १३ लक्ष ५४ हजार ४७४ रुपये लाभांश रक्कमेच्या वाटपाचा तसेच सभासदांसाठीच्या एकुण १० लक्ष रुपये रक्कमेच्या दिपावली फराळ किराणा कीटांचे वाटपाचा शुभारंभ दि.२२ ऑक्टोबर २०२४ मंगळवार रोजी संस्थेचे संचालक मंडळ व मान्यवरांच्या हस्ते उपस्थित सभासदांना रोख लाभांश व किराणा कीट देत करण्यात आला. याप्रसंगी चेअरमन नारायणराव डिगे, व्हाईस चेअरमन सुरेशराव ढवळशंक, व्यवस्थापक दिगांबरजी गुरसाळी, माजी चेअरमन कचरुशेठ झाडे, माजी व्हाईस चेअरमन सर्जेराव महाराज आळणे, सर्वश्री संचालक नवनाथराव म्हेत्रे, अरुणराव गुरसाळी, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेब मस्के, श्रीमती.सिताबाई रामभाऊ डिगे, सौ.रंजनाताई शिवाजीराव टकले, सौ.शैलजाताई अर्जुनराव भंडारे यांच्यासह सभासद बांधव कोष्टी समाजाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली रोकडे, गुरुप्रसाद गुरसाळी, दत्तात्रय वीर, शिवाजीराव टकले, अर्जुनराव भंडारे, वैजिनाथ डिगे, बाबुराव खाटोकर, सुदामराव गलांडे,

किसनराव फासे, आश्रुबा मुंडे, कैलास भुजबळ, दत्तात्रय पारखे, लक्ष्मणराव भंडारे, गणेशराव डिगे, वल्लभप्रसाद गुरसाळी, विश्वनाथ दिवटे, अनिल आलगट, दिलीप शिंदे, सुभाष टिकुळे, रामेश्वर रेडेकर, विठ्ठल वरवडे, संजय खटावकर, राम बाबर, दगडू गुरसाळी, नारायण टिपरे यांसह पतसंस्थेचे कर्मचारी सचिन म्हेत्रे, सोमेश्वर मस्के, ईश्वर ढवळशंक, राहूल बागडे, अविनाश वाव्हळ, लखन टिकुळे, अल्पबचत ठेव प्रतिनिधी ज्ञानेश्वर गुरसाळी, ज्ञानेश्वर डिगे, अजय भैरट, विजय हेंद्रे, केशव टकले, डिगांबर झाडे, शिवाजी लोकरे व इतर सभासद व ग्राहक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. रामलिंग पतसंस्थेच्या वतीने या दिवाळीमध्येही सर्व सभासदांना लाभांश रक्कम तसेच फराळ किराणा कीटांचे वाटपही होत असल्याने सर्व सभासदांची दिवाळी प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही गोड होत आहे. तरी ज्या सभासद बांधवांचे लाभांश व किराणा कीट घेवून जाणे बाकी आहे, अशांनी पतसंस्थेत येवून आपली लाभांश रक्कम व किराणा कीट हस्तगत करावी असे आवाहन चेअरमन नारायणराव डिगे यांनी केले आहे.

# मनसेचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांची केज शहरात दमदार एन्ट्री !

## केज शहरात आगमन होताच मनसे सैनीकांनी केले जंगी स्वागत,रमेश तात्या गालफाडे यांच्या उमेदवारीमुळे प्रस्थापितांची धाकधूक वाढली

**प्रतिनिधी । केज**

विधानसभा निवडणुकीचे उमेदवारी अर्ज भरण्याची लगीनघाई सुरू आहे. सर्वच पक्षांनी आपापले काही उमेदवार जाहीर केलेले आहेत.तर उर्वरित उमेदवारांबद्दल खलबते सुरू आहेत.परंतु ज्या उमेदवारांची नावे घोषित झालेले आहेत त्यांनी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात केलेली आहे. यातच केज विधानसभा मतदारसंघासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून रमेश तात्या गालफाडे यांना उमेदवारी जाहीर झाल्याने प्रस्थापितांची धाकधूक वाढली आहे.

मागच्या अनेक महिन्यां पासून रमेश गालफाडे हे केज मतदार संघामध्ये तळ ठोकूनआहेत.मतदार संघातील बहुतांश गावांना त्यांनी भेटी देऊन मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.काही दिवस ते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून उमेदवारी मिळवण्याच्या प्रयत्नात होते परंतु राशपने माजी आमदार पृथ्वीराज साठे यांना उमेदवारी जाहीर केल्याने राशपचे सर्वांसाठीच दरवाजे बंद झाले.मात्र रमेश तात्या गालफाडे यांनी मोठ्या प्रमाणावर जनसंपर्क दौरे केल्याने आणि निवडणूक लढवायचीच या उद्देशाने केज मतदार संघामध्ये चाचपणी केल्याने त्यांनी तात्काळ



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली आणि उमेदवारीही पदरात न पाडून घेतली. भाजपकडून विद्यमान आमदार नमिता मुंदडा राशपचे पृथ्वीराज साठे हे उमेदवार निश्चित झालेले आहेत.तसेच माजी आ. संगीताताई ठोंबरे याही उमेदवार म्हणून विधान सभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्यानेकेजविधानसभा मतदारसंघांमध्ये बहुरंगी लढतीची अपेक्षा आहे.तर राशपकडूनच प्रयत्नशील असलेल्या डॉ.अंजलीताई घाडगे यांनी आपला निर्णय अद्याप जाहीर केला नसला तरी जर त्या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या तर निश्चितच या निवडणुकीतप्रस्थापितांची डोकेदुखी वाढणार आहे. दरम्यान रमेश गालफाडे यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर प्रथमच केज शहरामध्ये आले असता त्यांचे मनसे सैनीकांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले.आणि मी माझ्या सामाजिक कार्याच्या जोरावर ही निवडणूक जिंकणारच असा आत्मविश्वास दाखवला असल्याने केज विधानसभा मतदार संघा तील मतदार आपली निर्णायक मते कुणाच्या पारड्यात टाकतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.दरम्यान मंगळवार नंतर निवडणूकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

# भाजपात दिग्गजांना बेदखल केले जाते तर सामान्यांची काय गत – राजेश देशमुख

## भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा दिला राजीनामा; पत्रकार परिषदेत घोषणा

**प्रतिनिधी । परळी**

मी भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असल्याने आता या पक्षाचा आणि माझा कसलाही संबंध उरलेला नाही. इथल्या नागरिकांच्या आशा आणि अपेक्षा सत्ताधाऱ्यांना पूर्ण करता आल्या नाहीत. त्याचा आम्ही पूर्णतः अभ्यास केल्याने मध्यंतरीच्या काळात शरदचंद्र पवार यांच्याकडे आम्ही उमेदवारी मागण्यांसाठी भेटलो आहोत. इथल्या संपूर्ण परिस्थितीची त्यांना सविस्तर माहिती देण्यासाठी शिष्टमंडळ सोबत घेऊन आम्ही मुंबई येथे त्यांची भेट घेतली. मागील काळात पंकजाताई यांच्यासोबत आम्ही काम करण्याचं ठरवल होत मात्र आता बीड जिल्ह्यात हा पक्ष शिल्लक राहतो की नाही अशी अवस्था आहे. जिथे पंकजाताई मुंडे यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांना त्या पक्षात नजरांदाज केले जाते तर आमच्या भवितव्याचा इथे विचार केला जाणार नाही असे वाटल्याने आता आम्ही ज्या मूळ पुरोगामी विचारांच्या पक्षात काम करत होतो तिथेच परत येऊन काम करण्याचे मी ठरवले असल्याचे ज्येष्ठ नेते राजेश देशमुख यांनी पत्रकार परिषदेत म्हटले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे मी उमेदवारी देण्यासाठी मागणी केली आहे. त्यांनी सकारात्मक भावना व्यक्त केली आहे मात्र त्यांचा जो निर्णय असेल तो आम्हाला मान्य असेल. परळी विधानसभा मतदारसंघातील परिस्थिती बदलायची असेल तर आता शरद पवारांच्या पाठीशी राहून पुरोगामी विचारांचा उमेदवार या विधानसभा निवडणुकीत निवडून आणावा लागेल. जरांगे पाटलांनाही आम्ही भेटलो आहोत, ते काही ठिकाणी निवडणूक लढवणार आहेत तर काही ठिकाणी सक्षम उमेदवारांना पाठिंबा देणार अशी त्यांची भूमिका आहे. त्यांचा विशिष्ठ पक्ष नाही किंवा त्यांचे ठराविक असे चिन्ह नाही. त्यांनी सर्वांनाच उमेदवारी दाखल करायला लावले आहे. सारासार विचार करूनच ते अंतिम निर्णय घेतील. शरदचंद्र पवार साहेबांचा पक्ष रास्त विचारांवर काम करणारा पक्ष आहे असे आम्हाला वाटते. ते सर्वांचे ऐकतात, समजून घेतात आणि आलेल्या प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रयत्न करतात ह्या गोष्टी मला विशेष वाटतात. मला हे सर्व आवडल्याने त्यांच्या सोबत जाण्याचा आम्ही विचार केला आहे. स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी उभा केलेला भारतीय जनता पक्ष फार लवकर बीड जिल्ह्यातून संपत आहे याच आम्हाला दुःख वाटत. अगोदर आम्ही मी भारतीय



जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देऊन नंतर पवार साहेबांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याने आज मी अधिकृतपणे राजीनामा दिला आहे असे ज्येष्ठ नेते राजेश देशमुख म्हणाले.

# शिवसेना शिंदे गटाच्या केज युवासेनेचे नव निर्वाचित तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते व शहर प्रमुख आकाश चाळक याचा केज शिवसेनेच्या वतीने सत्कार संपन्न

**प्रतिनिधी । केज**

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे,संसदरत्न खा. डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी बीड जिल्ह्यातील परळी, अंबाजोगाई,केज विभागा चे पदाधिकारी जाहीर केले असून शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक व अनिल दादा जगताप यांच्या मार्गदर्शना खाली यावेळी नव निर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार केज तालुका शिवसेनेच्या वतीने करण्यात आला.यावेळी दादासाहेब ससाणे, शिवसेना केजविधानसभा प्रमुख,जयाताई राऊत महिला आघाडी तालुका प्रमुख,वैशालीताई सांगळे शहर प्रमुख, महेंद्र चाटे उपतालुकाप्रमुख तानाजी धस,उप तालुकाप्रमुख दत्ता काकडे विभागप्रमुख शिवाजी गायकवाड,युवा सेना उपतालुकाप्रमुख, युवानेते अविनाश ससाणे, आकाश काकडे,शाखा प्रमुख,बाळासाहेबससाने, रतन पटेकर,विलास घुले, उमेश माने,सागर चाळक, उमेश डोईफोडे,किरण खडके,ज्ञानेश्वर काळे, पवन अंधारे,कृष्णा चाळक,बबलू चाळक, विशाल गूंड आदी शिव सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अंबाजोगाईमध्ये पेशवा प्रतिष्ठानच्या विविध वस्तू प्रदर्शनाला प्रतिसाद

## दीपावलीनिमित्त आयोजन : प्रदर्शनास मान्यवरांसह नागरिकांची भेट

प्रतिनिधी । अंबाजोगाई

दीपावली सणानिमित्त पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित उद्योग आरंभ वस्तू विक्री प्रदर्शनास उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. दीनदयाळ बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवस्कर, उद्योजक अमोल जड, राहुल देशपांडे, रेखा जोशी, वैजयंती टाकळकर, डॉ. महेश अकोलकर, राहुल कुलकर्णी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

याप्रसंगी व्यवसायाची निवडलेली पायवाट ही महामार्गात रूपांतरित होण्यासाठी समाजातील व्यावसायिकांना अथक परिश्रमाची गरज असून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत त्याच बरोबर संयम आणि गुणवत्ता यातूनच भरभराट निश्चित होते असे मत उपस्थित पाहुण्यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक प्रणिता पोखरीकर यांनी केले तर संचालन अनिता औटी यांनी केले. आभार प्रतीक्षा जोशी यांनी मानले.

या प्रदर्शनात विविध सजावटीचे साहित्य, सौंदर्य प्रसाधने, ज्वेलरी, आरोग्यविषयक प्रोडक्ट, साडी व कपडे तसेच घरगुती तयार केलेले विविध वस्तू व पदार्थ याचे स्टॉल लावण्यात आले होते. प्रदर्शनासाठी सहकार्य करणाऱ्यांचे संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले.विक्री प्रदर्शनास अनेक मान्यवरांसह अंदाजे ५ हजार ग्राहकांनी भेटी दिल्या.वस्तूविक्री प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी प्रमुख पदाधिकारी डॉ संकेत तोरंबेकर, शिरीष



हिरळकर, विवेक बाभुळगावकर , श्रीकांत जोशी,अक्षय देशमुख ,आदित्य राखे, केदार दामोषन, गौरव कुलकर्णी, ड वैजनाथ वांजरखेडे, गोविंद जोशी,दीपक कुलकर्णी, अध्यक्षा कल्याणी कुलकर्णी, श्रीया जोशी, शुभांगी पत्की, मनीषा कुलकर्णी, ममता दीक्षित, वैशाली पांडे, रोहिणी जड,ज्योत्स्ना लाटकर ,वर्षा मिरगे, राजश्री पिंपळे, मयुरी तोरंबेकर, अपर्णा भालेराव, राजश्री देशमुख, रोहिणी राखे, स्वरुपा कुलकर्णी,गायत्री राडीकर यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संदीप कोतकर यांच्यासह समर्थकांवर खोटा गुन्हा; कार्यकर्त्यांनी घेतली मोठी भूमिका

## सचिन कोतकरसह शिष्ट मंडळाने घेतली एसपींची भेट / घटनेची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी

अहिल्यनगर /प्रशांत बाफना

शहराचे माजी महापौर संदीप कोतकर हे केडगाव येथे आल्यावर त्यांची ग्रामस्थांनी भेट घेतल्यावर केडगाव देवीची दर्शन घेऊन ते निवासस्थानी निघून गेले. परंतु संग्राम कोतकर यांनी मनात पुर्वग्रह ठेवून कुकारस्थान रचण्याच्या उद्देशाने गुरुवारी (दि. २३) रात्री कोतवाली पोलिस ठाण्यात खोटी फिर्याद दिली आहे. संबधीत फिर्याद ही खोटी असून संबधीत प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी अशी मागणी सचिन कोतकर यांच्यासह शिष्टमंडळाने पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन मागणी केली आहे.संबधीत फिर्याद देणाऱ्यांचे मोबाईल कॉल डिटेल्स व रेकॉर्डींग तपासून त्यांना संपर्क करणारे संशयीत व्यक्ती व राजकीय दबाव टाकणारे यांचा शोध लावण्यास मदत होऊन संबधीत घटनेची सत्यतता तपासण्यास सहकार्य होईल. फिर्याद देणार हे न्युसेन्सिकल पार्श्वभुमी असलेले व उपद्रवी व्यक्ती असून विनाकारण खोट्या केसेस, खटले दाखल करण्याची सवय आहे. अशा उपद्रवी लोकांमुळे परिसरातील आमच्यासरख्या नागरिकांना त्रास होत आहे. त्यामुळे वारंवार कौटुंबिक जीवन विस्कळीत होत आहे. वरील नोंदविलेल्या खोट्या तक्रारीची योग्य ती शहानिशा करावी, तसेच फिर्यादीचे व त्यांच्या संपर्कातील व्यक्तीचे मोबाईल कॉल डिटेल्स तपासून कारवाई करावी, कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल झालेली फिर्याद रद्द करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे.यावेळी शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनावर विजय कराळे, राहुल कांबळे, गणेश साळुंके, विनोद लगड,गणेश सातपुते, संतोष बारस्कर, आदित्य शिंदे, सागर सातपुते, भुषण गुंड, सिराज शेख, महेश कांबळे, सचिन सातपुते, अमोल सातपुते, संकेत सातपुते, सोमनाथ कराळे, नवनाथ घेबुंड, राजेश सातपुते, प्रशांत कार्ले, अभिजित ठुबे, अशोक कराळे, ऋषिकेश सातपुते, सौरभ कोतकर, अशोक कोतकर यांच्या सह्या आहेत

# अंधाराला शिव्या देत बसण्यापेक्षा उठून एखादा दीप प्रज्वलित करा...!

बळ द्या..!

# संभाजीनगरमधे विधानसभेची निवडणूक लढवणारे प्रामाणिक आणि तरुण नेते कॉम. अभय टाकसाळ यांना बळ द्या..!

छत्रपती संभाजी नगर ।प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. लोकशाहीचा सर्वोच्च महोत्सव..! युत्या, आघाड्या, महाआघाड्या आपल्या समोर येतील. विकासाचे, जनकल्याणाचे दावे केले जातील. आश्वासनांची खैरात प्रचाराची राळ उडवून देईल. जाती धर्माचे, भावभावनांचे आवाहन करून मत मिळवण्याचा राजरोस प्रयत्न होईल. संधीसाधू राजकारणी गट तगडा, तत्व, पक्ष,विचारसरणी खेळ खोटा. बेरोजगारी कित्तेक पटींनी वाढली, शिक्षणाचा बाजार झाला, खाजगीकरणाने नोकऱ्या गायब झाल्या, मोजके तरुण आयटीत गेले, बाकीची सगळी पोर मॉल, झोमाटो, शोरूम मधे राबती झाली, कारखान्यातून, कार्यालयातून कंत्राटी मधे भरती झाली.. !

नुकताच एक सर्वे आला. ६२% लोकप्रतिनिधी गुन्हा असलेले, ९३% लोकप्रतिनिधी करोडपती.राजकारण म्हणजे सत्ता मिळवणे, सत्तेतून संपत्ती वाढवणे आणि संपत्तीच्या जोरावर पुन्हा सत्ता मिळवणे.निती मूल्यांची ऐशीतैशी, संविधानाची पायमल्ली. कल्याणकारी राज्य व्यवस्था उध्वस्त, उद्योगपतींना मोकळे रान.महागाई सर्वत्र..जातीयवाद, धर्मवाद आणि पैसावाद शिखरावर, अर्थव्यवस्था जगात अव्वल स्थानावर आणि भूक, मानवी हक्क निर्देशांक तळाशी. विषमतेचे सर्वग्रासी ग्रहण लोकशाहीला आणि प्रजासत्ताकाला.बदल ही आपली सर्वांचीच गरज आहे.पण कोण आणि कसा घडवणार बदल हा प्रश्न महत्त्वाचा आहे. गोरगरीब जनतेशी बांधिलकी जपणारे, संविधानाच्या मूल्यावर निष्ठा असलेले, तत्वाशी प्रामाणिक आणि अन्याय अत्याचार उघड करून त्याच्या मुकाबल्यासाठी सदैव सिध्द असणारे कार्यकर्ते, नेतेच असा बदल घडवू शकतात हे त्रिकालाबाधित सत्य होय. कुठे असतात असे नेते असे कार्यकर्ते ? ते असतात आपल्या आजूबाजूला, आपल्या शहरात, वस्तीत गावात कुठेही. ते सतत झटत असतात, लोकांना संघटीत करण्यासाठी.. मोर्चा आंदोलन सत्याग्रह निषेध संप घेराव हे असते त्यांचे कार्यक्षेत्र न्यायासाठी, समतेसाठी.गांधी नेहरू आंबेडकर आणि भगतसिंग यांच्या स्वप्नातला भारत निर्माण करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन आयुष्यभर कार्यरत असलेली ही माणस तुमच्या आमच्या सारखी, आपल्याच हाडामासांची...

आपल्या शहरात अशी माणस आहेत आणि ही कोणतेच आमिष किंवा कसल्याच दबावाला बळी न पडता सामान्य माणसांचे जगणे सुसह्य व्हावे म्हणून पोटतिडकीने भांडणारी ही जगावेगळी माणस हे या शहराच भूषण आहे. अत्यंत विपरीत परिस्थितीतील एक आशास्थान आहे. ज्यांचे राजकीय जीवन अत्यंत नितळ आणि स्वच्छ आहे अशी काही नाव सांगतो,साथी सुभाष लोमटे, भिमराव बनसोड, राम बाहेती, भालचंद्र कांगो, विष्णु ढोबळे आणि असे अनेक..! पन्नास पन्नास वर्षे सार्वजनिक जीवनात कार्यरत राहून सुध्दा बेदाग लखलखते व्यक्तित्व असलेले हे नेते म्हणजे संभाजीनगरचे खरेखुरे ऐश्वर्य.तुम्ही कुणाला ओळखत असाल, भेटले किंवा ऐकले असेल तर याची प्रचिती नक्कीच आली असणार. अशाच तेजस्वी नेत्यांच्या प्रभावळीतील एक उभरते नाव म्हणजे कॉम अभय टाकसाळ.वडिलांकडून लाभलेला डाव्या विचारांचा दैदिप्यमान वारसा, व्यवसायाने वकील, उत्तम वक्ते, कुशल संघटक आणि सर्वात महत्वाचे म्हणजे बांधिलकी जनतेशी.असंघटित कामगार, फेरीवाले, अंगणवाडी कर्मचारी, रिक्षाचालक, महाविद्यालयीन विद्यार्थी, कंत्राटी कामगार यांच्या हक्कासाठी सतत संघर्षात असलेले, घाटीच्या दवाखान्यात सर्व उपचार मोफत मिळावेत, गरीब रुग्णांसाठी नवनवी यंत्र सामग्री उपलब्ध व्हावी म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करणारे, जाती धर्माच्या भिंती ओलांडून माणुसकीचे नाते जपणारे तरुण तडफदार व्यक्तिमत्व म्हणजे हे कॉम. अभय टाकसाळ.अशी माणस राजकारणात यावीत, सत्तेवर जावीत असे सर्वानाच वाटते. कल्पना करा, असा एखादा प्रामाणिक निष्कलंक कार्यकर्ता आमदार म्हणून आपल्या शहरात असला तर सामान्य माणसाला किती आधार वाटेल ? केवढे बळ मिळेल ? अन्याय अत्याचार करणाऱ्यावर, गुन्हेगारांवर, नोकरशाहीवर कसा अंकुश राहील ? होय ही शक्यता निर्माण झाली आहे. कॉम टाकसाळ यांनी संभाजीनगर मध्य मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करून आपल्याला एक संधी उपलब्ध करून दिली आहे. आता आपली पाळी आहे. पुढारी भ्रष्ट आहेत, राजकारण वाईट आहे म्हणून बोटे मोडत बसायचे की प्रामाणिक समाज सेवकाच्या मागे तन मन धनाने उभे राहून त्याला आपला प्रतिनिधी म्हणून पाठवायचे.आपल्या निर्णयावर लोकशाहीचे आणि प्रजासत्ताकाचे भवितव्य अवलंबून आहे आणि म्हणून निर्णय घ्यावा लागणारच आहे.तुम्ही कुणाच्या बाजूचे,उबदार श्रीमंतांच्या की तळागाळातील गोरगरीब जनतेच्या. कॉम. अभय टाकसाळ यांना सढळ हाताने मदत करा, प्रचार करून निवडून आणा हीच कळकळीची विनंती,धन्यवाद.

# शेतकऱ्याच्या प्रतीक्षा यादीप्रमाणे सौर ऊर्जा पंप द्यावा:- अनिल बोर्डे

गेवराई :- गेवराई तालुक्यातील राज पिंपरी येथील शेतकरी श्री दामोदर राधा किसनराव पानखडे यांनी ऑनलाइन पद्धतीने पत्र क्रमांक ५१४८४ दिनांक १९/९/२१ नुसार सौर ऊर्जा पंप मिळण्यासाठी नोंदणी केलेली आहे परंतु संबंधितांना अद्याप पर्यंत सौर ऊर्जा पंप प्राप्त झाल्या नसल्याची तक्रार बीड जिल्हा ग्राहक पंचायतकडे प्राप्त झालेली आहे.

याप्रकरणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे उपाध्यक्ष व गेवराई ग्राहक मार्गदर्शन केंद्रप्रमुख अनिल बोर्डे यांनी याप्रकरणी व्यवस्थापक महाऊर्जा बीड माननीय जिल्हाधिकारी बीड यांना श्री पानखडे यांना अद्याप पर्यंत सौर ऊर्जा पंप प्राप्त झालेला नाही. असे कळविण्यात आले आहे. त्यांच्याबरोबरच्या नंतरच्या शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंप प्राप्त झाला आहे परंतु संबंधितांना आजपर्यंत सौर ऊर्जा पंप प्राप्त झाला नाही ही बाब गंभीर आहे. सदरील प्रकरणावर आपण जातीने लक्षपूरवून संबंधितांना तात्काळ सौर ऊर्जा पंप उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यापुढे शेतकऱ्यांच्या तक्रारी येणार नाहीत याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. ही बाब गंभीर आहे. बरेच शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंप मंजूर होऊन देखील महावितरण करून कसल्याही प्रकारचा संदेश येत नाही. बरेच शेतकरी या लाभापासून वंचित आहेत असे निदर्शनास आले आहे यावर महावितरण कसल्याही प्रकारची कार्यवाही करीत नाही. आपण मे २०२३ पर्यंत सर्व शेतकऱ्यांचे अर्ज निकाली काढून सौर ऊर्जा पंप दिल्याचे प्रत्यक्ष आपल्या कार्यालयात सांगितले आहे. सदरील २०२१ मधील सौर ऊर्जा पंप अध्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. यावरून आपल्या कार्यालय चा कारभार निर्दशनास येत आहे. याप्रकरणी आजपर्यंत शेतकऱ्याला कसल्या प्रकारची माहिती दिलेली नाही. व शेतकऱ्यांच्या आवेदनातीलचुका दुरुस्त केल्या जात नाहीत. शेतकऱ्याला सहकार्य केले जात नाही. बऱ्याच शेतकऱ्याला सौर ऊर्जा पंप मंजूर



होऊन देखील आपल्या कार्यालयाचा संदेश प्राप्त होत नाही. त्यामुळे शेतकरी सौर ऊर्जा पंपा पासून वंचित राहत आहे. बीड जिल्ह्यातील शेतकरी वर्ग बहुसंख्य हाअ शिक्षित असल्यामुळे अर्ज भरताना संगणक सेवा चालक यांनी चुकीचे व स्वतःचे नंबर टाकल्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना सौर ऊर्जा योजनेचा लाभ मिळालेला नाही असे निदर्शनास आले आहे. या प्रकरणावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. दामोदर पानखडे यांचे प्रकरण सन २०२१ मधील त्यांना तात्काळ सौर ऊर्जा योजनेचा लाभ देण्यात यावा. संबंधित कर्मचाऱ्यावर योग्य ती कारवाई व्हावी. म्हणजे असे प्रकार वारंवार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. मागेल त्याला सौर ऊर्जा पंप उपलब्ध करून देण्याबाबतचे शासनाचे धोरण असल्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंप देण्यात यावेत. सदरील प्रकरणाचा निपटारा तात्काळ करण्यात यावा इतर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांचे प्रलंबित आवेदन पत्र तात्काळ मंजूर करण्यात यावेत आपल्या कार्यालयाकडून दूरध्वनीद्वारे शेतकऱ्यांना सूचना देण्यात यावी उर्वरित सर्व शेतकऱ्यांना सौर ऊर्जा योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष बीड जिल्हा अनिल बोर्डे यांनी संबंधित कार्यालयाकडे केली आहे.

# स्वराज्य संग्रामच्या ठाणे शहर मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

ठाणे ।राजयोग प्रतिनिधी

ऑक्टोबर रोजी स्वराज्य संग्रामचा ठाणे शहर जिल्हा मेळावा येथील काशिनाथ घाणेकर हॉल येथे संपन्न झाला. स्वराज्य संग्रामचे अध्यक्ष तानाजीराव शिंदे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या मेळाव्यास प्रमुख अतिथी म्हणून कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार मा. श्री निरंजनजी डावखरे, ठाणे मनपाच्या नगरसेविका स्नेहाताई रमेशराव आंब्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वराज्य संग्रामचे प्रदेश पदाधिकारी सर्वश्री विक्रांत आंब्रे प्रदेश सरचिटणीस, उदय भाऊ आंबोणकर प्रदेश उपाध्यक्ष, अनंतराव देशमुख प्रदेश उपाध्यक्ष,शरद जाधव- किनीकर प्रदेश सरचिटणीस ,ठाणे सकल मराठा समाजाचे नेते रमेशराव आंब्रे, सोलापूर युवक आघाडीचे संपर्कप्रमुख आकाश पवार आदी मान्यवर उपस्थित




होते यावेळी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल मा. आमदार निरंजनजी डावखरे व सौ स्नेहाताई आंब्रे यांचा समाज गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी आ.निरंजनजी डावखरे, अध्यक्ष तानाजीराव शिंदे व स्नेहाताई आंब्रे यांच्यासह अन्य मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले सदर मेळाव्यात स्वराज्य संग्राम ठाणे शहर जिल्हा कमिटी निवडण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाप्रमुख प्रशांत मोरे ,सरचिटणीस अजित सिंग यांनी विशेष परिश्रम घेतले मेळाव्याचे सूत्रसंचालन विजय निकम सर यांनी केले.




# इरा पब्लिक स्कुल चा संकल्प जितेंद्र दहिफळे ब्लॅकबेल्ट ने सन्मानित

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील नामांकित इरा पब्लिक स्कुल चा पहिलीतील विद्यार्थी संकल्प जितेंद्र दहिफळे हा ब्लॅकबेल्ट मिळवणारा जिल्ह्यातील सर्वात लहान वयाचा विद्यार्थी ठरला, युनायटेड शटकोन कराटे डु इंडिया ने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक विद्यार्थी परीक्षेस बसले होते, या सर्वात संकल्प दहिफळे हा सर्वात लहान वयाचा विद्यार्थी असून त्याने या सर्व प्रकारात नाविन्यपूर्ण अशी कामगिरी करून दाखवली,या बाल चिमुकल्याचे जिल्ह्यातील सर्व स्तरातून कौतुक होत आहे,त्याच्या या कामगिरीची दखल घेवून इरा पब्लिक स्कुल चे संस्थापक अध्यक्ष गणेश क्षीरसागर, सचिव श्रीमती वर्षा क्षीरसागर, प्राचार्या अश्विनी कुलकर्णी, वर्ग शिक्षीका रेखा काळे,यांनी संकल्प चा शाळेच्या वतीने यथोचित सत्कार केला,त्याच्या या यशात जिल्हा मार्गदर्शक नितिन पवार

,तालुका कोच अमित कानडे यांनी अथक परिश्रम घेतले,संकल्प हा गेवराई तालुका शिक्षक पतसंस्थेचे युवा संचालक जितेंद्र दहिफळे यांचा लहान चिरंजीव आहे,शिक्षण क्षेत्रातील ही सर्व मान्यवरांनी त्याच्या यशाचे कौतुक केले.

# भंगार वाल्यांची दिवाळी जोरात

## वडखळ मध्ये भंगार विक्रेत्यांना सुगीचे दिवस!

गडब/सुरेश म्हात्रे

देशात दिवाळी हा सण जोरात साजरा होत असतो. या करता न चुकता घराची साफसफाई आणि रंगरंगोटी करण्यात येत असते. अशा वेळी वापरात नसलेले टाकऊ सामान भंगार विक्रेत्याला विकून काही पैसे खिशात टाकून घेण्याला पसंती दिली जाते. याचा फायदा भंगार सामान खरेदी करणाऱ्या विक्रेत्यांना होत असून या विक्रेत्यांची देखील दिवाळी जोरात साजरी होत आहे.

दिवाळी सणाला अनेकजण नवीन साहित्य खरेदी करण्याला पसंती देत असतात. यामध्ये सोने, नवीन वाहन, इलेक्ट्रॉनिक्स सामान, फर्निचर, भांडी, विविध प्रकारच्या शोभवंत वस्तू यांचा समावेश असतो. कालांतराने यापैकी बरेच सामान वापराता येत नसल्याने आडगळीत टाकले जाते. इतर वेळी अडगळीत टाकलेल्या या साहित्या कडे दुर्लक्ष केले जाते. मात्र, दिवाळीत करण्यात येणाऱ्या साफसफाई वेळी हे साहित्य बाहेर काढले जाते. यातील टाकाऊ सामान भंगार खरेदी करणाऱ्या विक्रेत्यांना विकण्यासाठी नेले जाते. भंगार खरेदी करणारे विक्रेते देखील भंगारात आलेल्या वस्तूंच्या किंमतीनुसार दर देऊन आलेल्या ग्रहकाला खुश करत असतात. यामुळे ग्राहक आणि विक्रेता



या दोघांची दिवाळी जोरात साजरी होते.

विक्रेत्यांना फायदा

भंगारात खरेदी केलेले साहित्य विक्रेते पुढे मोठ्या व्यापाऱ्याकडे विक्रीसाठी पाठवत असतात. यातून भंगार खरेदी करणाऱ्या छोट्या विक्रेत्यांना देखील मोठा आर्थिक फायदा होत असतो. दिवाळीत हे प्रमाण जास्त असल्याची माहिती एका भंगार विक्रेत्याने सांगितली आहे.

अनेकजण भंगार म्हणून सगळ्याच प्रकारचे टाकाऊ साहित्य घेऊन येतात. आम्ही देखील ग्राहकाला नाराज न करता भंगारात विकले जाऊ शकत नसलेले थोडेफार सामान विकत घेत असतो

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# बदामराव पंडितांना आमदार करण्यासाठी सरपंच संतोष हातागळे यांचा शिवसेनेत प्रवेश

## चव्हाणवाडीत राष्ट्रवादी व भाजपला मोठा हादरा

गेवराई (प्रतिनिधी)

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना महाविकास आघाडीची उमेदवारी जाहीर होताच गेवराई विधानसभा मतदारसंघातील अनेक गावातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश करत आहेत. चव्हाणवाडी येथील असंख्य कार्यकर्त्यांनी बदामराव पंडितांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये प्रवेश केल्याने भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मोठा हादरा बसला आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडी कडून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना उमेदवारी जाहीर होताच राजकीय वातावरण चांगले ढवळून निघाले आहे. सातत्याने जनतेच्या संपर्कात राहणाऱ्या बदामराव पंडित यांच्याकडे



गोरगरिबांनी सामान्य माणसांचा कल असल्याचे दिसत आहे. त्यांची उमेदवारी जाहीर होताच तलवाडा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर दिनांक २६ ऑक्टोबर २०२४ रोजी चव्हाणवाडी येथील सरपंच संतोष हातागळे, यांच्यासह शहादेव हातागळे, भगवान हातागळे, बाबुराव हातागळे, अच्युत हातागळे, ओमकार चौधरी, लक्ष्मण हाणगे, महादेव हातागळे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला आहे. गोरगरिबांसाठी आणि सामान्य माणसासाठी हक्काचा व्यक्ती म्हणून बदामराव आबा हाच प्रत्येकाला आपला माणूस वाटतो आणि म्हणून ते राजकारणात टिकले पाहिजेत, या प्रामाणिक हेतूने बदामराव पंडित यांना गेवराई विधानसभा मतदारसंघाचा आमदार करण्यासाठी आम्ही जीवाचं रान करू. तालुक्याचं पुन्हा वाटोळं होऊ द्यायचं नसेल तर बदामराव पंडित यांच्या मागे शेतकरी कष्टकरी अठरापगड जाती आणि सामान्य माणसाने उभारणे काळाची गरज आहे असे स्पष्ट प्रतिपादन सरपंच संतोष हातागळे यांनी व्यक्त केले. माझ्या अडचणीच्या काळात ज्यांनी ज्यांनी मला साथ दिली आणि जे जे माझ्या सोबत येतील त्यांना आयुष्यभर मी विसरणार नाही अशी स्पष्ट ग्वाही माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी यावेळी दिली.

याप्रसंगी श्रीमंत यादव, काशिनाथ आढागळे, कैलास राठोड, सुनील कांडेकर, उज्वल सुतार, भुजंग शेळके यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गेवराई विधानसभेवर शिवसेनेचा भगवा फडकवणयासाठी शिवसैनिकांनी सज्ज रहावे - जिल्हाप्रमुख गणेश वरेकर , परमेश्वर सातपुते

गेवराई /प्रतिनिधी

विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बदामराव अबा पंडित यांच्या प्रचाराचा नारळ दि. २५/१०/२०२४ रोजी बीड तालुक्यातील अशापुरक गणपती मंदिरात शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत फोडण्यात आला.

यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर व परमेश्वर सातपुते सर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, बीड जिल्ह्यातील गेवराई विधानसभा हा आपला एकुलता एक मतदार संघ आहे व तो आपल्याला कोणत्याही परिस्थितीत काबीज करावाच लागेल. यासाठी शिवसैनिक व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे



असे आवाहन केले. यानंतर लगेचच नाथापुर ,रंजेगाव ,मुगगाव ,पाटेगाव ,सांडरवण ,लिंबारुई ,ताडसोनना,घाटजवळा ,वलीप्रु ,वलीपूर तांडा ,बेडकूची वाडी ,ई.सह अनेक गावचा दौरा करून लोकांचे आशिर्वाद घेतले.यावेळी विविध गावचे सरपंच, गावकरी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विधानसभेच्या निवडणुकीत झेंड्यावर मत नाही, तर अजेंडा वर मतदान मा.ना. बच्चू कडू यांचे प्रतिपादन

## देगलूर- बिलोली विधानसभेसाठी सुभाषरावजी साबणे यांचा नामांकन अर्ज दाखल

देगलूर (प्रतिनिधी)

देगलूर शहरातील मार्केट कमिटी मोंढा या मैदानात जाहीर सभा घेण्यात आली. या ऐतिहासिक सभेस महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री आणि प्रहार जनशक्तीचे प्रमुख बच्चू कडू, तसेच शेतकरी नेते शंकर अण्णा धोंडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी हजारोंच्या संख्येने जमलेल्या जनसमुदायाने आपल्या उत्साहाने या कार्यक्रमाला उर्जा दिली.

सभेत बोलताना बच्चू कडू यांनी ठामपणे घोषणा केली की, या वेळी झेंड्यावर मत मिळणार नाही, तर. अजेंडा वर मत मिळणार असे सूचित करत त्यांनी मतदारांना सजग राहण्याचे आवाहन केले. त्यांनी ७५ वर्षांनंतरही शेतकरी व शेतमजुरांच्या स्थितीत फारसा बदल न झाल्याचे सांगत, या निवडणुकीत परिवर्तनाची लढाई लढण्याचे वचन दिले.रॅलीचा प्रारंभ होत मेन रोड ने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज याच्या पुतळ्यास अभिवादन करून सुभाषराव साबणे यांनी तिसरी आघाडीच्या प्रहार पक्षाकडून गुरुपुष्यामृताचा मुहूर्त साधत माजी मंत्री बच्चुभाऊ कडू, यांच्या समवेत नामांकन अर्ज दाखल केला.

यावेळी माजी आमदार सुभाष साबणे यांनी आपल्या प्रचार सभेत बोलताना मराठा आरक्षण, रोजगाराची संधी देगलूर बिलोली मतदारसंघाचा विकास आरोग्य, शिक्षण, शेतमालाला भाव, हे प्रचाराचे मुद्दे असतील हा उमेदवारी अर्ज मी लोकांच्या आग्रहामुळे दाखल केला आहे असे ते म्हणाले

# दिपावली सणानिमित्त बीड शहरातील व्यापार्यांना रात्रीचा वेळ वाढवून द्यावा - प्रकाशराव कानगावकर

बीड /प्रतिनिधी

सध्या विधानसभा निवडणूका असल्याने आदर्श आचार संहिता लागू आहे. प्रशासनाने व्यापार्यांना रात्री १० वाजेपर्यंतच आपापली प्रतिष्ठाने उघडी ठेवण्यासाठी परवानगी दिलेली आहे. परंतु हिंदू संस्कृतीतील दिवाळी हा सण सर्वात मोठा आहे, हा सण प्रत्येक जण मोठ्या उत्साहात साजरा करतो, गोरगरीब देखील आपल्या परिस्थितीप्रमाणे हा सण साजरा करतात. उद्योग, व्यवसायासाठी देखील हा काळ म्हणजे भरभराटीचा असल्याने बाजारपेठेत ग्राहकांची खरेदीसाठी मोठी वर्दळ होत असते, त्यामुळे प्रशासनाने व्यापार्यांना घालून दिलेली वेळेची मर्यादा दिवाळी सणामुळे वाढवून द्यावी अशी मागणी बीड शहर व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी केली आहे.

पोलीस प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिवाळीचा



सण अवघ्या दोन-तीन दिवसांवर आलेला आहे. त्यामुळे बाजारपेठेत सध्या ग्राहकांची खरेदीसाठी वर्दळ होत आहे. दिवाळी सणामुळे बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात सर्वच व्यापार्यांचे वेळेअभावी गैरसोय होत आहे. ग्राहकांना सोयीनुसार खरेदी करता यावी यासाठी व्यापार्यांना प्रशासनाने घालून दिलेल्या वेळीची मर्यादा ही अपुरी पडत आहे. ग्राहकांना देखील याचा त्रास होत असून खरेदी अभावीच घरी परतावे लागत आहे. रात्री १० वाजेपर्यंतच प्रतिष्ठाने उघडी ठेवण्यास परवानगी असल्याने हा वेळ व्यापार्यांना पुरेसा होत नाही. ग्राहक रात्री १० नंतर घरी परतल्यामुळे याचा नाहक तोटा व्यापार्यांना सहन करावा लागत आहे. दिवाळी सणामुळे प्रशासनाने व्यापार्यांना रात्री उशीरापर्यंत प्रतिष्ठाने उघडी ठेवण्यास परवानगी देण्यात यावी तसेच बीड जिल्हा व्यापारी महासंघाच्यावतीने जिल्हा पोलीस अधिक्षक यांना निवेदन देण्यात येणार आहे. प्रशासनाने व्यापार्यांच्या मागणीची दखल घ्यावी असे बीड शहर व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांच्यासह जिल्हाध्यक्ष भास्करराव जाधव, कार्याध्यक्ष अशोकराव शेटे, राजेंद्र मुनोत, तालुका अध्यक्ष राजेंद्र बनसोडे, सुशील खटोड, नागेश मिटकरी सचिव तुकाराम साळुंके, सुदाम चव्हाण, सचिव सूर्यकांत महाजन, विनोद ललवाणी, बालाप्रसाद जाजू, गंगाभिषण करवा, रामचंद्र जोशी, जवाहरलाल कांकरिया, औताडे आप्पा, गणेश मुळे, देविदास मसुरे, गजानन मानकुस, विनायक पतंगे, मच्छिंद्र उपरे, अरुण देवधरे, किरण वाघमारे, किरण पतंगे, ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केली आहे.

# नानाजी देशमुख विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांकडून जिव्हाळा केंद्रातील अनाथांना फराळाचे वाटप

बीड /प्रतिनिधी

येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये, दीनदयाळ शोध संस्थान द्वारा संचलित, नानाजी देशमुख विद्यामंदिर बीड.या शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांकडून जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे सर्व अनाथ, बेघर, ज्यांना कोणीही नाही अशा सर्वांना दीपावलीच्या सणाचे औचित्य साधून फराळाचे वाटप केले. त्याच बरोबर या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने अनाथां साठी आकाश कंदील तयार करून सर्व बेघरांना सस्नेह भेट दिले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अर्चना मोराळे मॅडम यांनी बेघर निवारा केंद्रास भेट देण्याचे प्रयोजन आपल्या मनोगतामध्ये सांगितले. शिवाय मुलांमध्ये समाजसेवा रुजावी आणि आज समाजामध्ये वयोवृद्ध आजी आजोबा यांना समाजातील नागरिकांनी अनाथ आश्रमामध्ये दाखल न करता मायेने आपल्या कुटुंबामध्ये सांभाळ करावा ही भावना व्यक्त केली. बीड शहरातील नागरिकांनी अनाथांच्या प्रती आपले देणे लागते या उद्देशाने या ठिकाणी वाढदिवस पुण्यतिथी लग्नाचा वाढदिवस लहान मुलांचे वाढदिवस करून अन्नदान करावे असे आवाहन केले. मुलांनी शिक्षण घेत असताना, शिक्षणासोबतच आपल्या आजी आजोबांवर देखील प्रेम, माया, ममता, जिव्हाळा रुजावा या उद्देशाने सर्व शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी अनाथालयातील सर्वांची मायेने चौकशी केली. आणि त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. तसेच जिव्हाळा बेघर केंद्रातील व्यवस्थेचे बद्दल आणि स्वच्छतेबाबत समाधान व्यक्त केले.

संचालक अभिजीत वैद्य यांनी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात राहत असलेल्या सर्व अनाथ, बेघर पुरुष, महिलांची काळजी निवारा केंद्र कशी घेते, याबद्दल सखोल माहिती दिली. व्यवस्थापक राजू वंजारे यांनी सर्व विद्यार्थ्यांना समाजसेवे बद्दल विविध उदाहरणे देऊन समाजसेवा कशी केली जाते? याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. शिवाय जिव्हाळा केंद्रात अनाथ, बेघर, मनोरुग्णांना मायेने निवारा केंद्रात आणले जाते, त्यांची दाढी कटिंग आम्ही करतो. त्यांना अंघोळ घालून स्वच्छ कपडे देतो. दोन वेळेचे जेवण देऊन त्यांना माणूस बनवण्याचे कार्य आम्ही करतो.आलेल्या सर्व शिक्षकांचे मुलांना बेघर निवारा केंद्रामध्ये घेऊन आल्याबद्दल मनापासून आभार मानले. काळजी वाहक छाया सरोदे यांनी कार्यक्रमासाठी आलेल्या शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.या कार्यक्रमाला नानाजी देशमुख विद्या मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अर्चना मोराळे, सौ रत्नमाला सुरवसे, सौ जयश्री देशपांडे, सौ कल्याणी दिवटे,



श्री सुनील देशमुख, जिव्हाळा केंद्राच्या महिला काळजीवाहक छाया सरोदे, मोठ्या संख्येने अनाथ, बेघर लाभार्थी उपस्थित होते.

# बीड जिल्हा वकील संघाकडून दिवाळी फराळ





बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा वकील संघाकडून दिवाळीनिमित्त फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. न्यायालयाच्या नुतन इमारतीमध्ये सर्व न्यायीक अधिकारी व वकील संघ पदाधिकारी, सदस्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

दिवाळी फराळ कार्यक्रमाच्या प्रारंभी वकील संघाचे अध्यक्ष ॲड.आर.डी. येवले यांनी सर्व न्यायीक अधिकारी, वकील संघाच्या सदस्यांना दिवाळी निमित्त शुभेच्छा दिल्या. त्यानंतर प्रभारी जिल्हा व सत्र न्यायाधीश सुरेखा पाटील यांनी वकील सदस्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सचिव अॅड.यासेर पटेल यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रभारी जिल्हा व सत्र न्यायाधीश सौ.सुरेखा पाटील यांच्यासह वकील संघाचे अध्यक्ष ॲड.आर.डी. येवले, उपाध्यक्ष नितीन वाघमारे, अविनाश गडगे, सचिव यासेर पटेल, सहसचिव श्रीकांत जाधव, कोषाध्यक्ष धनंजय गिराम, ग्रंथपाल सचिव भीमा जगताप, महिला प्रतिनिधी छाया वाघमारे, वकील संघाचे ज्येष्ठ सदस्य, सरकारी वकील उपस्थित होते.

# बंडखोरी अन् घराणेशाही

निवडणुका म्हटले की, बंडखोरी अन् घराणेशाही हे जणू काही समीकरणच तयार झाले आहे. एखादा नेत्याला संबंधित मतदारसंघातून मतदारांनी निवडून दिल्यास तो मतदारसंघ आपल्या सात-बारावरच लिहून दिला गेला आहे, अशा आविर्भावात हे नेते वावरतात. राजकारणातील वारसा हक्कामुळे नव्यांना संधी निर्माण होत नाही. मतदारच काय, पण त्या पक्षातील नेत्यांनादेखील राष्ट्रीय स्तरावर आपला उमेदवार घराणेशाही सोडून निवडता येत नाही, हे आपल्या लोकशाहीचे दुर्दैव म्हणावे लागेल. घराणेशाहीतूनच बंडखोरीचा उदय होतो. एकेकाळी राजकारण हे समाजसेवेचे व्रत समजून यात उतरणारे आता दुर्लभ ठरत आहेत. मात्र, हातावर मोजण्याइतक्या निःस्वार्थ नेत्यांमुळे लोकशाही जिवंत आहे, हे दुर्लक्षून चालणार नाही. एकाच घरात वडिलांपासून नातवापर्यंत सर्वांनाच उमेदवारी हवी असते. मतदारसंघ ही या 'घरंदाजांना' आपली जहागिरी वाटू लागते. मतदारदेखील वारंवार त्यांना निवडून देतात. या नेत्यांना सत्तेची चटक लावण्यात मतदारही तेवढेच जबाबदार म्हटले पाहिजे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत घराणेशाही आणि त्यातून निर्माण होणाऱ्या बंडखोरीच्या परंपरेने सर्वपक्षीयांत आपली पाळेमुळे घट्ट रोवली आहेत. एकेकाळी काँग्रेसवर घराणेशाहीचा आरोप करणाऱ्या भाजपनेदेखील आता आपल्या ध्येयधोरणात बदल करत काँग्रेसचीच 'री' ओढण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. लोकसभेनंतर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा घराणेशाही दिसली आहे. कुठे आपल्या मुला-मुलीला, तर कुठे पत्नीला राजकारणात आणले जात आहे. त्यांची राजकीय सोय लावली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)चे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या कन्या अदिती तटकरे यांना श्रीवर्धनमधून उमेदवारी मिळाली आहे. अजित पवारांनी छगन भुजबळ यांना येवला-लासलगाव मतदारसंघातून उमेदवारी दिली असली, तरी काही दिवसांपूर्वी त्यांनी आपला मुलगा पंकज भुजबळ यांची विधान परिषदेवर वर्णी लावली. खासदार नारायण राणे सध्या भाजपमध्ये असले, तरी त्यांचे दोन्ही पुत्र वेगवेगळ्या पक्षांत असणार आहेत. नितेश राणे यांना भाजपकडून कणकवली विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यांचे दुसरे पुत्र माजी खासदार नीलेश राणे कुडाळ-मालवण विधानसभेतून लढण्यासाठी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. उद्धव ठाकरेंनी त्यांचे पुत्र आदित्य ठाकरे यांना वरळी विधानसभा मतदारसंघातून पुन्हा एकदा मैदानात उतरवले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांचे पुत्र अमित ठाकरे यांना माहीममधून उमेदवारी जाहीर केली आहे. घराणेशाहीला नेहमी विरोध करणाऱ्या भाजपने अनेक नेत्यांच्या मुलांना तिकिटे दिली आहेत. भाजप नेते आशिष शेलार यांना वांद्रे पश्चिममधून उमेदवारी जाहीर केली, तर त्यांच्या भावालाही मैदानात उतरवले आहे. त्यामुळे भाजपने अनेक कुटुंबांत दोघांना उमेदवारी दिली आहे. रावसाहेब दानवे यांनी जालना लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्यात त्यांचा पराभव झाला होता. भाजपने त्यांचा मुलगा संतोष दानवे यांना भोकरदनमधून उमेदवारी जाहीर केली.एकूणच विधानसभा निवडणूक ही नात्यांमध्येच लढली जाणार आहे. त्यामुळे एक सदस्य पराभूत झाला, तरी दुसऱ्या सदस्यामुळे सत्तासुंदरी त्याच घराण्यात राहणार, हे निश्चित. या घराणेशाहीमुळे शेतकरी, कामगार, आदिवासी असे दुर्लक्षित वर्ग राजकारणापासून दुरावले आहेत. आता त्यांनीही छोट्या छोट्या संघटना बनवून राजकारणात उतरण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र, सत्तेपर्यंत पोहोचण्याचे त्यांचे मनसुबे नेहमीच असफल ठरतात. याला कारण मतदार आहेत. त्यांच्यावर घराणेशाहीद्वारे लादलेला उमेदवार ते नम्रपणे स्वीकारतात. मात्र, यातून या नेत्यांची मुजोरी वाढते. आपल्याशिवाय या मतदारांना कोणताच पर्याय उपलब्ध नाही, असा त्यांचा समज होतो. आपण ब्रिटिशकालीन कायदे बदलले आहेत. अशा वेळी ब्रिटिशकालीन लोकशाहीतील निवडणूक पद्धतीतदेखील बदल करण्याची गरज आहे. बंडखोरी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या पक्षांची वाढती संख्या पाहता अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रासारख्या द्विशासन पद्धतीवर विचार करण्याची गरज आहे. त्यामुळे जातीय आधारावर पक्षांची निर्मिती होणार नाही. अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष तिसऱ्यांदा निवडणूक लढू शकत नाही. १९४७ मध्ये यूएसएच्या राज्यघटनेतील दुरुस्तीनुसार तेथील राष्ट्राध्यक्षांना केवळ दोन वेळाच निवडणूक लढता येते. त्यानंतर त्यांना सक्तीची विश्रांती घ्यावी लागते. आपणदेखील तरुणांना राजकारणात संधी देण्यासाठी सतत निवडून येण्याचा पायंडा मोडीत काढला पाहिजे. त्याच त्याच लोकांना पुन्हा निवडून दिले की, मतदारसंघात व त्यांच्या मानसिकतेत एक प्रकारे साचलेपण निर्माण होते. यातून नव्या कल्पना, गोष्टींना वाव मिळत नाही. वारंवार त्याच मतदारसंघातून निवडून येणारे हे प्रतिनिधी स्वतःला पुढे जाऊन त्या मतदारसंघाचे जहागीरदार समजू लागतात. त्यांच्यातील लोकसेवेची परंपरा लोप पावून हुकूमशाहीची परंपरा सुरू होते. यातून हे बाहुबली उमेदवार मतदारांबरोबरच पक्षालादेखील जुमानत नाहीत. पक्षाने तिकीट नाकारले की, हेच नेते पक्षांतर करतात. पूर्वी पक्षाच्या जोरावर उमेदवार निवडून येत असत. आता उमेदवारांच्या मेहरबानीवर पक्ष टिकून आहेत. मात्र, ही पद्धत लोकशाही यंत्रणा मोडीत काढणारी ठरू पाहत आहे. पक्षांतरबंदी कायदा मध्यंतरी लागू करण्यात आला, पण पुढे त्याचे काय झाले कोणालाच माहीत नाही. प्रत्येक निवडणुकीत या कायद्याची पद्धतशीरपणे मोडतोड केली जाते. महाराष्ट्रात झालेल्या सत्तांतरात तर हा कायदाच धाब्यावर बसविण्यात आल्याचे दिसते. राजकारण्यांच्या या पक्षांतर व घराणेशाहीला वेसण घालण्यास एक प्रकारे आपले कायदे अपुरे पडत आहेत. घराणेशाही व त्यातून निर्माण होणारी बंडखोरी सुदृढ लोकशाहीला हुकूमशाहीकडे नेणारी असते.

प्रशांत बाफना/अहमदनगर प्रतिनिधी
८०५५४४०३८५

# भाजपची २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

## फडणवीसांच्या मर्जीतल्यांना संधी, पडळकरही मैदानात

प्रतिनिधी । मुंबई

विधानसभा निवडणुकांसाठी भाजपने २२ उेमदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. यापूर्वी, ९९ उमेदवारांची पहिली यादी भाजपने जाहीर केली होती. त्यामुळे, भाजपकडून आत्तापर्यंत १२१ उमेदवारांची नावे जाहीर झाली आहेत. भाजपच्या दुसऱ्या यादीतही देवेंद्र फडणवीसांच्या मर्जीतील नेत्यांनाच संधी मिळाल्याचं पाहायला मिळत आहे. भाजपच्या दुसऱ्या यादीत भाजच्या दुसऱ्या यादीत जतमधून गोपीचंद पडळकर यांना संधी देण्यात आली असून अकोल्यातून विजय अग्रवाल यांना उमेदवारी मिळाली आहे. तर, नाशिक मध्य मतदारसंघातून देवयानी फरांदे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. यासह, पुण्यातील तीन मतदारसंघात उमेदवार जाहीर झाले असून खडकवासलामधून भीमराव तापकीर, पुणे कंन्टोनमैंट मतदारसंघातून सुनिल कांबळे, कसबा पेठ मतदारसंघातून हेमंत रासने यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

भाजपने जाहीर केलेल्या दुसऱ्या यादीत सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर मतदारसंघातून समाधान औताडे यांना तिकीट देण्यात आलंय. त्यामुळे, प्रशांत परिचारक यांना संधी मिळणार नसल्याचे स्पष्ट झालं आहे. भाजपने जारी केलेल्या दुसऱ्या यादीमध्ये विदर्भातील ९ मतदार संघाचा समावेश आहे. तर, पुण्यातून तीन उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. मात्र, भाजपच्या दुसऱ्या यादीत मुंबईतील एकही नाव नाही. दरम्यान, गोपीचंद पडळकर यांना जत विधानसभा




मतदारसंघातून भाजपा महायुतीची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर जत जनसंपर्क कार्यालयात सहकाऱ्यांनी पेठे भरवून अभिनंदन केले.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपासाठी महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांमध्ये रस्सीखेंच सुरु आहे. महाविकास आघाडीतही अनेक जागांवरुन खल सुरु आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीचा महायुतीचा फॉर्म्युला अंतिम टप्प्यात आल्याची माहिती आहे. पुढील फॉर्म्युल्यानुसार महायुती निवडणूक लढण्याची शक्यता आहे. यामध्ये भाजप १५३, शिवसेना ८० आणि राष्ट्रवादी काँग्रेस ५५ जागांवर लढणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. जागा वाटपात पुन्हा एकदा भाजपकडून ९ आकड्याचे गणित जुळण्यात आल्याचे बोलले जात आहे. भाजप मुंबईत १८ जागा लढवणार आहे. भाजपकडून १४ जागांवर उमेदवार निश्चित करण्यात आले आहेत,

# विधानसभा निवडणुकीत पैशांचा पाऊस!

## १० दिवसांत तब्बल १०० कोटींची मालमत्ता जप्त

प्रतिनिधी । नवी दिल्ली



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आचारसंहिता लागल्यापासून पोलीस यंत्रणेसह निवडणूक आयोग अलर्ट मोडवर आले आहे. अनेक ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली असून मोठ्या प्रमाणात पोलीस तैनात करण्यात आले आहेत. आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी विशेष कामगिरी करत आतापर्यंत कोट्यावधी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत गेल्या १० दिवसांत एकूण १०० कोटी ४० लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

# भाजपात दिग्गजांना बेदखल केले जाते तर सामान्यांची काय गत - राजेश देशमुख

## भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा दिला राजीनामा; पत्रकार परिषदेत घोषणा

प्रतिनिधी । परळी

मी भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असल्याने आता या पक्षाचा आणि माझा कसलाही संबंध उरलेला नाही. इथल्या नागरिकांच्या आशा आणि अपेक्षा सत्ताधाऱ्यांना पूर्ण करता आल्या नाहीत. त्याचा आम्ही पूर्णतः अभ्यास केल्याने मध्यंतरीच्या काळात शरदचंद्र पवार यांच्याकडे आम्ही उमेदवारी मागण्यांसाठी भेटलो आहोत. इथल्या संपूर्ण परिस्थितीची त्यांना सविस्तर माहिती देण्यासाठी शिष्टमंडळ सोबत घेऊन आम्ही मुंबई येथे त्यांची भेट घेतली. मागील काळात पंकजाताई यांच्यासोबत आम्ही काम करण्याचं ठरवल होत मात्र आता बीड जिल्ह्यात हा पक्ष शिल्लक राहतो की नाही अशी अवस्था आहे. जिथे पंकजाताई मुंडे यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांना त्या पक्षात नजरांदाज केले जाते तर आमच्या भवितव्याचा इथे विचार केला जाणार नाही असे वाटल्याने आता आम्ही ज्या मूळ पुरोगामी विचारांच्या पक्षात काम करत होतो तिथेच परत येऊन काम करण्याचे मी ठरवले असल्याचे ज्येष्ठ नेते राजेश देशमुख यांनी पत्रकार परिषदेत म्हटले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे मी उमेदवारी देण्यासाठी मागणी केली आहे. त्यांनी सकारात्मक भावना व्यक्त केली आहे मात्र त्यांचा जो निर्णय असेल तो आम्हाला मान्य असेल. परळी विधानसभा मतदारसंघातील परिस्थिती बदलायची असेल तर आता शरद पवारांच्या पाठीशी राहून पुरोगामी विचारांचा उमेदवार या विधानसभा निवडणुकीत निवडून आणावा लागेल. जरांगे पाटलांनाही आम्ही भेटलो आहोत, ते काही ठिकाणी निवडणूक लढवणार आहेत तर काही ठिकाणी सक्षम उमेदवारांना पाठिंबा देणार अशी त्यांची भूमिका आहे.



त्यांचा विशिष्ठ पक्ष नाही किंवा त्यांचे ठराविक असे चिन्ह नाही. त्यांनी सर्वांनाच उमेदवारी दाखल करायला लावले आहे. सारासार विचार करूनच ते अंतिम निर्णय घेतील. शरदचंद्र पवार साहेबांचा पक्ष रास्त विचारांवर काम करणारा पक्ष आहे असे आम्हाला वाटते. ते सर्वांचे ऐकतात, समजून घेतात आणि आलेल्या प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रयत्न करतात ह्या गोष्टी मला विशेष वाटतात. मला हे सर्व आवडल्याने त्यांच्या सोबत जाण्याचा आम्ही विचार केला आहे. स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी उभा केलेला भारतीय जनता पक्ष फार लवकर बीड जिल्ह्यातून संपत आहे याच आम्हाला दुःख वाटत. अगोदर आम्ही मी भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देऊन नंतर पवार साहेबांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याने आज मी अधिकृतपणे राजीनामा दिला आहे असे ज्येष्ठ नेते राजेश देशमुख म्हणाले.

# पंकजा मुंडेंचे खंदे समर्थक आडसकरांच्या हाती 'तुतारी'

## माजलगावच्या उमेदवारीचा पेच सुटला?

प्रतिनिधी । बीड

माजलगाव मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार दोन दिवसापूर्वीच फिक्स झालेले असतानाच शरद पवार पक्षाकडुन अद्याप उमेदवार जाहीर झालेला नाही. यातच शुक्रवारी संध्याकाळी शरद पवार यांच्या पक्षात मागील अल्पमताने पराभूत झालेले व पंकजा मुंडे यांचे खंदे समर्थक रमेश आडसकर यांनी तुतारी हातात घेतली. आता 'तुतारी'कडून रमेश आडसकर यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात आहे.

मागील एक वर्षात मराठा आंदोलनामुळे माजलगाव मतदार संघ ढवळून निघाला होता. यावेळी आमदार प्रकाश सोळंके यांनी या आंदोलनाबाबत एका कार्यकर्त्याशी फोनवर बोलताना अपशब्द वापरले होते. कार्यकर्त्याशी बोललेली क्लिप वायरल झाल्याने मराठा युवक आक्रमक झाले होते. दरम्यान एका आंदोलनावेळी या युवकांनी प्रकाश सोळंके यांच्या घरावर जाऊन त्यांचे घर पेटून दिले होते. यामुळे या ठिकाणी जरांगे फॅक्टरचा प्रभाव दिसून आला. याचा प्रत्यय लोकसभा निवडणुकीतील देखील पहावयास मिळाला. यामुळे विधानसभा निवडणुकीत आपल्याला शरद पवार गटाची उमेदवारी हवी म्हणून अनेक जणांनी बारामतीला चकरा मारून मारून आपली चप्पल शिजवली होती. दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसकडून आमदार प्रकाश सोळंके यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली. परंतु शरद पवार गटाकडे अनेक जण इच्छुक असल्यामुळे पहिले यादीत माजलगाव



मतदार संघातील उमेदवाराचे नाव जाहीर झाले नव्हते. यातच शुक्रवारी रमेश आडसकर यांचा शरद पवार गटात प्रवेश झाल्याने त्यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे.

रमेश आडसकर हे गोपीनाथराव मुंडे व पंकजा मुंडे यांचे समर्थक मानले जातात. मागील विधानसभा निवडणुकीत मतदारसंघा बाहेरील असताना देखील केज व परळी मतदारसंघातील भाजपच्या उमेदवाराला फायदा व्हावा म्हणून रमेश आडसकर यांना माजलगावची उमेदवारी जाहीर झाली होती. नवखे असताना रमेश आडसकर यांनी चांगली फाईट दिली. त्यांचा अल्पमताने पराभव झाला होता. महायुतीमध्ये माजलगाव मतदार संघ हा राष्ट्रवादी काँग्रेसला सुटल्यामुळे रमेश आडसकर यांना पक्ष बदलल्याशिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे त्यांनी शरद पवार यांची जवळीक करत आज शरद पवार गटात प्रवेश केला. मतदारसंघातील राजकीय गणिते पाहता त्यांची उमेदवारी फिक्स मानली जात आहे. मात्र, आडसकर यांनी 'तुतारी' हाती घेत राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केल्यामुळे पंकजा मुंडे यांना हा मोठा धक्का मानला जात आहे.

# महायुतीकडून महाविकास आघाडीची हवाई कोंडी! सर्व हेलिकॉप्टर बुक

### मविआची अडचण

भाजपच्या एकगठ्ठा बुकिंगमुळे मविआने राजस्थान, कर्नाटक, गुजरात आणि दिल्लीहून प्रत्येकी २ तर बंगळुरूहून ४ हेलिकॉप्टर महिनाभरासाठी बुक केल्याची माहिती मुंबईतील एका कंपनीने दिली.एका हेलिकॉप्टरचे दरमहा ९० तासांप्रमाणे २ महिन्यांचे सरासरी शुल्क असे- ट्विन इंजिन ५ लाख द १८० तास = ९ कोटी
सिंगल इंजिन ३.५ लाख द १८० तास = ६.३० कोटी

प्रतिनिधी । बीड




लोकसभेचा निकाल लागताच भाजपने विधानसभेच्या प्रचारासाठी ऑक्टोबर- नोव्हेंबरकरिता राज्यात उपलब्ध सर्व २५ हेलिकॉप्टर बुक केले. ऐन प्रचारात निवडणुकीतील 'हवाई कोंडी' टाळण्यासाठी विरोधी पक्षाने राजस्थान, दिल्ली, कर्नाटक आणि गुजरातहून हेलिकॉप्टर मागवल्याची माहिती छत्रपती संभाजीनगरसह पुणे, मुंबई, दिल्लीतील एव्हिएशन कंपन्यांनी दिली. मागणी वाढल्याने लोकसभेच्या तुलनेत हेलिकॉप्टर सेवेच्या दरात १५ ते २०% वाढ झाली

आहे. हेलिकॉप्टर उड्डाणांचे निश्चित वेळापत्रक नसते. अशा उड्डाणांना नॉन शेड्युल्ड ऑपरेशन परमिट म्हणतात. राजकारणी, उद्योजकांना ही सेवा परवडते. डीजीसीएच्या डिसेंबर २०२३ च्या अहवालानुसार देशात १९१ हेलिकॉप्टर आहेत. पैकी १९ विविध राज्यांच्या मालकीचे आहेत. महाराष्ट्रातील ७१ हेलिकॉप्टरपैकी ग्लोबल वेक्ट्रा एव्हिएशनचे ३० तर हॅलिगोचे १५ आहेत. या कंपन्या राज्य शासन, ओनएजीसीला सेवा पुरवतात. खासगी मालकी,

# पोलीस स्थानकासमोर रात्रभर ठिय्या आंदोलन, संगमनेरमध्ये वाद चिघळला

प्रतिनिधी । अहमदनगर

**संगमनेर तालुक्यातील धांदरफळ येथे भाजपचे माजी खासदार सुजय विखे यांच्या संकल्प सभेचे आयोजन करण्यात आलं होतं. या सभेत भाजपच्या एका वक्त्याने जयश्री थोरात यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याने संगमनेर तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेचे काँग्रेस पक्षातून तीव्र पडसाद शहरात उमटले आहेत. या विधानामुळे संतप्त झालेल्या कार्यकर्त्यांनी काही ठिकाणी अनेक गाड्यांच्या काचा फोडल्या तर काही ठिकाणी गाड्यांना आग देखील लावण्यात आली.**

सदर घटनेनंतर रात्री दहाच्या सुमारास जयश्री थोरात डॉक्टर सुधीर तांबे, दुर्गा तांबे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात दाखल झाले. आक्षेपार्ह विधान करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी पोलीस ठाण्यासमोरच ठिय्या आंदोलन सुरू केलं. तब्बल ७ तास हे आंदोलन सुरू असून पहाटे पाच पर्यंत दोन फिर्यादी दाखल करण्यात आले असून तिसरी फिर्याद नोंदवण्याचं काम सुरू असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

दुर्गाताई तांबे काय म्हणाल्या?

एकीकडे लाडकी बहीण योजना आणण्याचं व त्याचा प्रचार करायचा आणि दुसरीकडे महिलांविषयी असे अपशब्द वापरायचे, अशी टीका करत दुर्गाताई तांबे यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला आहे.




### नेमकं प्रकरण काय?

दरम्यान, संगमनेर तालुक्यातील धांदरफळ गावात आज (दि.२५) सुजय विखे यांची सभा झाली. सुजय विखे यांच्या या सभेत बाळासाहेब थोरात यांच्या मुलीबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात आले आहे. जयश्री थोरात यांच्यावर खालच्या पातळीवर टीका करण्यात आली आहे. आपल्या कन्येला समजवा, नाहीतर आम्ही निवडणुकीच्या काळात मैदानात उतरलो, तर तुमची मुलगी घराबाहेर पडणार नाही. सुजय विखे पाटील, त्यांना ताई म्हणातात. पण सुजयदादा या ताईचे पराक्रम सगळ्या तालुक्याला माहिती आहे. असं विधान वसंतराव देशमुख यांनी केलं. सुजय विखे मंचावर उपस्थित असताना जयश्री थोरात यांच्याबद्दल खालच्या पातळीवर टीका करण्यात आली आहे. टीका करणारे वसंतराव देशमुख धांदरफळ गावातील रहिवासी आहेत. त्यानंतर देशमुख यांच्या विरोधात काँग्रेस कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. सभास्थळी ठिय्या मांडत काँग्रेस कार्यकर्त्यांकडून वक्तव्याचा निषेध करण्यात आला आहे.

### सुजय विखे काय म्हणाले?

सदर घटनेनंतर या घटनेचे तीव्र पडसाद उमटल्यानंतर सुजय विखे यांनी देखील आपली प्रतिक्रिया दिली आहे. वादग्रस्त वक्तव्याचा सुजय विखे यांनीही निषेध केलाय. मी त्यांना ताई म्हणून संबोधलं, त्यामुळे महिलांचा सन्मान व्हायलाच हवा असं सुजय विखेंनी म्हटलंय. मात्र ज्यांनी आमच्या गाड्या जाळल्या त्यांच्यावरही कारवाई करा अशी मागणी देखील सुजय विखे यांनी केली. तसेच आमच्याबद्दल चुकीच वक्तव्य केलं, तर आम्ही देखील गप्प बसणार नाही, असा इशारा देखील सुजय विखे यांनी दिला.

